रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक १६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, २ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

स्वातंत्र्यदिनी राज्यभर विक्रमी आरोग्य संस्थांचे लोकार्पण/२
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडला इतिहास/६
राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंचा दबदबा!/८

## केंद्राकडून राज्यांना एक लाख नऊ हजार कोटींचे कर वितरण



**नवी दिल्ली :** राज्यांच्या वित्तीय व्यवस्थेला बळकटी देत विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने केंद्राने शनिवारी सर्व राज्यांना एक लाख नऊ हजार कोटी रुपयांच्या कर वितरणाचा अतिरिक्त अग्रीम हप्ता वितरित केला. राज्यनिहाय वाटपानुसार महाराष्ट्राला सात हजार २२ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्राप्त झाला. केंद्राने ही रक्कम १० ऑगस्टला होणाऱ्या नियमित मासिक कर हस्तांतरणाव्यतिरिक्त वितरित केली. या अतिरिक्त निधीमुळे राज्यांना पायाभूत सुविधा उभारणी, विविध विकास प्रकल्प, भांडवली खर्च तसेच प्राधान्याच्या लोककल्याणकारी योजनांसाठी आर्थिक तरतूद करता येईल. विकासकामांच्या अंमलबजावणीला गती मिळण्यास व निधी नियोजन सक्षमपणे करण्यासदेखील यामुळे मदत होणार आहे.

# कॉमनवेल्थ टेबल टेनिस स्पर्धेत ‘सीकेटी’च्या स्वस्तिका घोषला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील पदव्युत्तर शिक्षण घेणारी व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२६मध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करीत सुवर्णपदक पटकावून पनवेल आणि महाराष्ट्रासह देशाचे नाव उंचावले आहे. स्वस्तिका घोष महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असून शिक्षण आणि क्रीडा यांचा उत्कृष्ट समतोल साधत तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. वेगवान, आक्रमक आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण खेळाच्या जोरावर तिने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच यशस्वी



वाटचालीचा आणखी एक सुवर्ण अध्याय तिने कॉमनवेल्थ स्पर्धेत लिहिला आहे. भारतीय संघासाठी सुवर्णपदक जिंकून स्वस्तिकाने देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला असून तिच्या या देदिप्यमान कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तिच्या यशामुळे पनवेलच्या क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून युवा खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. स्वस्तिकाच्या ऐतिहासिक यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य व आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, क्रीडा संचालक डॉ. विनोद नाईक, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. स्वस्तिका घोषचे यश आमच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून तिच्या भावी कारकिर्दीसाठी आम्ही मनःपूर्वक शुभेच्छा देतो, अशा शब्दांत प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन केले आहे.

# रायगडमध्ये शेतपाणंद रस्त्यांचे तीन महिन्यांत सीमांकन

### आदिवासींसाठी वनहक्क मोहीम ▌ महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अनेक नावीन्यपूर्ण, ऐतिहासिक व महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची रायगड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करून गोरगरीब लोकांच्या कल्याणकारी शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवावा, असे स्पष्ट निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी (दि. १) अलिबाग येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व महसूल दिन कार्यक्रमात दिले.

आपल्या मार्गदर्शनात महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरणासाठी **(पान २...)**



### आदिवासींच्या जमिनी लाटण्याच्या प्रकारांना चाप लावणार!

आदिवासी लोकांची फसवणूक करून त्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचे प्रकार रायगड जिल्ह्यात समोर आले आहेत. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे तसेच त्या जागा ताब्यात घेऊन परत देण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्याच्या तक्रारी समोर आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील ३९ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. चौकशी पूर्ण झाल्यावर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्या जमिनी ताब्यात घेऊन आदिवासींना परत करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही महसूलमंत्र्यांनी सांगितले.

# बाल्मर लॉरी आणि शेल इंडियातील कंत्राटी कामगारांना भरघोस पगारवाढ

### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून बाल्मर लॉरी आणि शेल इंडिया येथील कंत्राटी कामगारांच्या पगारवाढ व इतर सोयीसुविधांचा महत्त्वपूर्ण करार शनिवारी (दि. १) पार पडला. संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या करारामुळे कामगारांच्या वेतनात भरघोस वाढ झाली असून त्यांच्यामध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

बाल्मर लॉरी येथील एल. आर. भोईर व एल. एन. भोईर यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कामगारांच्या पगारवाढीचा हा करार यशस्वी करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी सातत्याने सविस्तर पाठपुरावा केला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या करारानुसार कामगारांच्या एकूण पगारात तीन वर्षांच्या कालावधीसाठी तब्बल १० हजार २०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. याशिवाय कामगारांना दोन लाख रुपयांची वैद्यकीय पॉलिसी आणि इतर अनेक अत्याधुनिक सोयीसुविधा देण्याचे **(पान २...)**

### जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे यश



## निवडक

### कोहिनूर दुर्घटना; बिल्डिंग मालकासह कंत्राटदारावर गुन्हा

**भिवंडी :** गंगारामवाडीतील कोहिनूर इमारत कोसळून १० जणांच्या मृत्यूसह तीन जण जखमी झाल्याप्रकरणी मनपाच्या तक्रारीवरून बिल्डिंगमालक तसेच दुरुस्ती काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आवश्यक परवानगी न घेता निकृष्ट बांधकाम केल्याचा आरोप बिलाल अबूबकर खानवर ठेवण्यात आला. पिलरची दुरुस्ती करणारा कंत्राटदार अशोक यालाही आरोपी करण्यात आले आहे.

### अर्थव्यवस्थेची भरारी! जीएसटी संकलन २.११ लाख कोटींपार

**नवी दिल्ली :** जुलैमध्ये देशाचे एकूण वस्तू आणि सेवाकर म्हणजेच जीएसटी संकलन २.११ लाख कोटी रुपयांवर पोहचले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यामध्ये १५.४ टक्क्यांची मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त जीएसटी जमा होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये आतापर्यंतचे विक्रमी संकलन झाले होते.

# गुरुपौर्णिमेनिमित्त खारघरमध्ये गुरुपूजन

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वसंत पाटील यांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून खारघर येथील रांजणपाडा येथे निवृत्तीबुवा चौधरी यांच्या निवासस्थानी शनिवारी (दि. १) गुरुपूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमादरम्यान नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष हभप वसंत पाटील यांचा विशेष सन्मान माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी नितीन ठाकूर गुरुजी यांनी वसंत पाटील यांच्या जीवनकार्याची थोडक्यात माहिती दिली. गुरुवर्य निवृत्तीबुवा चौधरी यांनी वसंत पाटील यांनी अत्यंत खडतर परिस्थितीत संगीत शिक्षण घेऊन सुरू ठेवलेल्या संगीत साधनेचे कौतुक केले. **(पान २...)**

### एआय जनरेटेड व्हिडीओप्रकरणी भाई जगताप यांच्याविरोधात गुन्हा

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने कथित एआय जनरेटेड बनावट व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याच्या आरोपावरून काँग्रेस नेते भाई जगताप यांच्या विरोधात महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी महाराष्ट्र सायबरच्या नोडल सायबर पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. भाजपचे सोशल मीडिया सहसंयोजक निखिल भामरे यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्राथमिक चौकशी करून संबंधित अधिनियमातील तरतुदींनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# अजित डोवाल यांच्यामुळेच देश अंतर्बाह्य सुरक्षित : गृहमंत्री अमित शाह

### राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**पुणे : प्रतिनिधी**

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यामुळेच आज आपला देश अंतर्बाह्य सुरक्षित झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच त्यांची नियुक्ती केली. डोवाल यांनी इंटेलिजन्स ब्युरोच्या माध्यमातून देशासाठी योगदान दिले, असे गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि. १) पुणे येथे काढले. पुण्यातील टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते ‘लोकमान्य टिळक राष्ट्रीय’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,




उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. प्रणती टिळक, डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी देशाला ‘स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच’ हा बीजमंत्र दिला. स्वराज्य म्हणजे आपली भाषा, संस्कृती आणि धर्म होय. त्यांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या साजरे करण्याची प्रथा सुरू करून देशातील जनतेला जोडण्याचे काम करीत ‘सांस्कृतिक राष्ट्रवाद’ची मुहूर्तमेढ रोवली. आज देश याच राष्ट्रवादावर चालत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सोमवारी मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवाची धूम; १८०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत आयोजित केलेल्या ५९व्या युवा महोत्सवाचा शुभारंभ सोमवारी (दि. ३) सकाळी ९ वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा युवा महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडतो.

या युवा महोत्सवात कर्जत, खालापूर, उरण आणि पनवेल तालुक्यातील ४०हून अधिक महाविद्यालये सहभागी होणार असून सुमारे १८०० विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये आपली कला, सर्जनशीलता आणि विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर करणार आहेत. सदर युवा महोत्सवात एकूण ३२ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये ललित कला, साहित्य, नृत्य, संगीत आणि नाट्य या प्रमुख विभागांचा समावेश आहे. विविध कलाविष्कारांद्वारे विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा सादर करण्याची आणि राज्यस्तरीय स्पर्धांसाठी पात्र ठरण्याची संधी या महोत्सवातून मिळणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्याय रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असून शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबवत असते. आधुनिक पायाभूत सुविधा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक वातावरणामुळे महाविद्यालयाने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. युवा महोत्सवासारख्या मोठ्या सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करण्याचा मान मिळणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. महाविद्यालयाचे व्यवस्थापन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली कार्यरत असून संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य नगरसेवक परेश ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे तसेच इतर विश्वस्त मंडळ आणि व्यवस्थापन समिती शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे उपक्रम आणि सांस्कृतिक जडणघडण यावर संस्थेचा विशेष भर असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देत सांस्कृतिक परंपरेला नवे बळ देणारा हा महोत्सव निश्चितच यशस्वी ठरेल. डॉ. सुनील पाटील (संचालक, विद्यार्थी विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ) व निलेश सावे (सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ), उत्तर रायगड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. पराग कारूळकर आणि सहसमन्वयक प्रा. डॉ. दीपक गायकवाड व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. तनुजा सुमन यांच्या मार्गदर्शनाने सांस्कृतिक विभागातील इतर सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक व आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थी विद्यापीठाने आयोजित केलेल्या ५९व्या युवा महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित रायगड उत्तर विभाग (झोन-७) ची पहिली विभागीय फेरी यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत असून सदर कार्यक्रमाची तयारी परिपूर्ण झाली आहे.

# गडचिरोलीतील सती नदीत बुडून तीन चिमुकल्यांचा करुण अंत



**गडचिरोली : प्रतिनिधी**

शाळा सुटल्यानंतर आनंदाने घरी जाण्याऐवजी गावाजवळील नदीवर पोहायला गेलेल्या चार चिमुकल्यांपैकी तिघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत झाला. कुरखेडा तालुक्यातील खेडेगाव येथे शनिवारी (दि. १) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही हृदयद्रावक घटना घडली.

यात लक्ष्मण सुन्हेर दुधकवर, कुणाल नरेश दुधकवर आणि कोहित युवराज सराटे या तिन्ही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर आविश विनोद आमले या विद्यार्थ्याला मच्छीमारांनी वेळीच वाचवले. खेडेगाव येथील जिल्हा परिषद शाळेची सकाळची शाळा सुटल्यानंतर सदर चार विद्यार्थी गावाजवळील सती नदीच्या घाटावर पोहण्यासाठी गेले होते. नदीत पाण्याचा अंदाज न आल्याने हे चौघेही पाण्यात बुडू लागले.

याच सती नदी घाटावर कन्हारटोला येथील काही मच्छीमार बांधव मासेमारीचे काम करत होते. त्यांना चार मुले पाण्यात वाहून जाताना दिसली. त्यांनी तातडीने पाण्यात उड्या घेतल्या, मात्र तिघांचे मृतदेहच हाती आले. वाहून जात असतानाच आविश विनोद आमले या १३ वर्षीय विद्यार्थ्याच्या हाती एक झुडूप लागले. त्याला घट्ट पकडून त्याने जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रसंगावधान राखून मच्छीमारांनी तातडीने त्याच्याजवळ पोहोचून त्याला सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे त्याचा जीव वाचला.

या घटनेत लक्ष्मण सुन्हेर दुधकवर (६), कुणाल नरेश दुधकवर (५) आणि कोहित युवराज सराटे (११) या तिघांचा करुण अंत झाला. शाळा सुटल्यानंतर आनंदाने घराकडे निघालेली मुले सती नदीकडे गेली आणि दुर्दैवाने तिघांचा मृत्यू झाला. या घटनेने खेडेगावसह संपूर्ण कुरखेडा तालुक्यात शोककळा पसरली आहे.

# स्वातंत्र्यदिनी राज्यभर विक्रमी आरोग्य संस्थांचे लोकार्पण

## ◆ ग्रामीण आरोग्य सेवेला नवी ताकद मिळणार –मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील आरोग्य पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी ८० टयांहून अधिक बांधकामे पूर्ण झालेल्या आरोग्य संस्थांना युद्धपातळीवर कार्यान्वित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय, तसेच बांधकाम पूर्णत्वास येत असतानाच आवश्यक वैद्यकीय यंत्रसामग्री, फर्निचर, मनुष्यबळ आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विभागाच्या निर्णयामुळे स्वातंत्र्यदिनी राज्यात प्रथमच मोठ्या संख्येने आरोग्य संस्थांचे लोकार्पण होत आहे.



राज्यातील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ट्रॉमा केअर युनिट, स्त्री रुग्णालय अशा विविध आरोग्य सुविधा नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. राज्यातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आणि तातडीच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

जत, घनसावंगी, अंबड, बदलापूर, खर्डी, मोखाडा, डहाणू, सांगोला, कोंढाळ, ब्रह्मपुरी, वाडी (बु.), वाशीम, धुळे आदी ठिकाणांवरील आरोग्य संस्था उद्घाटनासाठी सज्ज आहेत. तसेच चंद्रपूर, धुळे, पुणे, जळगाव, बीड, छत्रपती संभाजीनगर, वाशीम, बुलढाणा आणि सोलापूर येथील विविध आरोग्य प्रकल्पही नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. या प्रकल्पांमध्ये आधुनिक ट्रॉमा केअर सेंटर, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्रशिक्षण केंद्रांचा समावेश आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि ब्लॉक सार्वजनिक आरोग्य युनिट्सची कामेही पूर्णत्वास आली आहेत. नागपूर, गडचिरोली, सांगली, सिंधुदुर्ग, नांदेड आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये नवीन आरोग्य सुविधा उभारण्यात आल्या असून, आवश्यक उपकरणे, मनुष्यबळ आणि प्रशासकीय पूर्तता करण्यात आली आहे. सर्व संस्था कार्यान्वित होण्यासाठी सज्ज करण्यात आल्या आहेत.

यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. अपघातग्रस्त, हृदयरुग्ण, माता–बालक तसेच आपत्कालीन रुग्णांना स्थानिक स्तरावरच अधिक गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर उपचार मिळणार आहेत. याचबरोबर आरोग्य कर्मचाऱ्यांनाही अधिक सुसज्ज कार्यपरिसर उपलब्ध होणार आहे.

याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने आरोग्य सेवा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. अनेक वर्षे विविध कारणांनी ज्या आरोग्य संस्थांची कामे रखडलेली होती व ज्यांची ८० टयांहून अधिक बांधकामे झाली आहेत, त्यांना प्राधान्याने पूर्णत्वास नेण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्या सर्व संस्था आधुनिक सुविधांसह नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. पूर्णत्वास येत असलेल्या उर्वरित आरोग्य संस्थांचेही 'आरोग्य संवाद' यात्रेदरम्यान लवकरच लोकार्पण करण्यात येणार आहे."

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने होत असलेले हे विक्रमी लोकार्पण राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला नवे बळ देणारे ठरणार असून, "सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा" हे राज्य शासनाचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साकार करण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

## खारघरमध्ये १८ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर नोडमधील वाहतूक कोंडी आणि अनधिकृत अतिक्रमणांबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत सिडको महामंडळाने मोठी निष्कासन मोहीम राबविली. या मोहिमेत सेक्टर ४० आणि सेक्टर ३७ परिसरातील एकूण १८ अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवून ती हटविण्यात आली.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत सेक्टर ४० येथील बागेश्री सोसायटीसमोरील तसेच नाल्यालगत उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणी वाहतुकीस अडथळा ठरत असलेले ७स्टॉल्स, १ सर्व्हिस सेंटर आणि १ गॅरेज शेड निष्कासित करण्यात आले.

याच मोहिमेदरम्यान खारघर सेक्टर ३७ मधील भूखंड क्र. NA–१ वर विनापरवानगी सुरू असलेली १ नर्सरी, ५ गॅरेज, २ फर्निचर दुकाने आणि १ ढाबा अशी एकूण ९ अनधिकृत बांधकामेही हटविण्यात आली. या कारवाईत नियंत्रक,

अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी सहभाग घेतला. भविष्यातही अनधिकृत बांधकामांविरोधातील अशा कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा सिडको प्रशासनाने दिला आहे.

सिडकोच्या माहितीनुसार, संबंधित सर्व बांधकामे महामंडळाच्या प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून तसेच कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल नोडचे नियंत्रक श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## शारलोट तलाव परिसरातील पुलाची दुरवस्था, पायऱ्यांना मोठे भगदाड

**माथेरान : बातमीदार**

थंड हवेचे पर्यटनस्थळ म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या माथेरान मध्ये सध्या पावसाळी पर्यटन हंगाम तेजीत सुरू असून मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत आहेत मात्र,पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असलेल्या शारलोट तलाव परिसरातील पुलाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या पुलाच्या पायऱ्यांना मोठे भगदाड पडल्याने पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



माथेरान मधील सुप्रसिद्ध शारलोट तलावाकडे जाण्यासाठी महात्मा गांधी मार्गावरील पांडे प्ले ग्राऊंड पिसरनाथ मंदिर मार्ग,एको पॉईंट मार्ग तसेच रिगल नाका–ब्राईट लँड–इन्स्पेक्शन बंगला मार्ग असे तीन प्रमुख मार्ग उपलब्ध आहेत.त्यापैकी एको पॉईंट मार्गाचा सर्वाधिक वापर पर्यटकांकडून केला जात आहे.या मार्गावरील सुमारे ४५ वर्षे जुन्या व जीर्ण पुलावरून पर्यटक शारलोट तलावाच्या सांडव्याजवळ म्हणजेच ओवरफ्लो जवळ पोहोचतात आणि वाहत्या पाण्याचा मनमुराद आनंद घेतात.या जुन्या पुलाच्या पायऱ्यांना भगदाड पडले असून पुलाच्या पृष्ठभागावर अनेक ठिकाणी खड्डे निर्माण झाले आहेत.स्लॅबच्या खालील भागातील लोखंडी सळ्याही उघड्या पडलेल्या दिसत आहेत.

सध्या मुसळधार पावसामुळे तलावाच्या सांडव्यावरील पाण्याचा प्रवाह वेगाने सुरू आहे.अशा परिस्थितीत जीर्ण पुलावरून ये–जा करणाऱ्या पर्यटकांना मोठा धोका निर्माण झाला असून कोणतीही दुर्घटना घडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही..पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित पुलाची तातडीने तांत्रिक पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी,तसेच धोका टळेपर्यंत सुरक्षिततेचे उपाय व इशारा फलक लावावेत अशी मागणी स्थानिकासह पर्यटकांकडूनही करण्यात येत आहे.

## नवी मुंबईतील स्मशानभूमी व्हिजनसाठी आमदार आग्रही

### *ग्रामविकासमंत्र्यांकडे बैठकीची आग्रही मागणी*

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका व सिडको क्षेत्रातील वेगाने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता, नागरिकांना अंत्यसंस्काराच्या अत्यंत संवेदनशील प्रसंगी सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी बेलापूर विधानसभेच्या लोकप्रिय आमदार मंदा म्हात्रे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे.

मंदा म्हात्रे यांनी 'स्मशानभूमी व्हिजन' या संकल्पनेअंतर्गत नवी मुंबईतील सर्व भागांतील स्मशानभूमींचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यात यावे, यासाठी ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तात्काळ बैठकीची आग्रही मागणी केली आहे.

यापूर्वी आमदार मंदा म्हात्रे यांनी दिवाळे गाव येथील स्मशानभूमीचा अत्यंत भव्य आणि आधुनिक पद्धतीने कायापालट केला आहे. दिवाळे गावातील स्मशानभूमीत नागरिकांसाठी सुसज्ज आणि स्वच्छ परिसर, पक्की सुरक्षा भिंत, सिमेंटचे रस्ते, फरसबंदी, आधुनिक दहन शेड, बसण्यासाठी उत्तम बैठक व्यवस्था, पिण्याचे शुद्ध पाणी, हिरवळ–वृक्षारोपण आणि पुरेशी प्रकाशयोजना उभारून या स्मशानभूमीचे एक आदर्श व सुंदर मॉडेल विकसित केले आहे.

पण तशाच प्रकारे संपूर्ण नवी मुंबईतील आणि विशेषतः ग्रामठाण्यांमधील स्मशानभूमींचा विकास व्हावा, हा मंदाताईंचा मुख्य उद्देश आहे. मुंबईची गर्दी कमी करण्यासाठी वसलेल्या नवी मुंबई शहरात सिडको वसाहती, झोपडपट्टी व खाजगी सोसायट्यांमधील वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार गावठाणातील स्थानिक स्मशानभूमींवर पडत असल्याने अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांची टंचाई जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व स्मशानभूमींमध्ये प्रदूषणमुक्त विद्युत व गॅस दाहिनी, सिमेंटचे रस्ते, फरसबंदी, आधुनिक जलनिसाःरण व्यवस्था, सुसज्ज प्रतीक्षागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे, पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय परिसराचे सौंदर्यीकरण, भव्य प्रवेशद्वार, नावाची नाम फलक, वृक्षारोपण करून सर्व स्मशानभूमींच्या दैनंदिन देखभालीसाठी स्वतंत्र 'मास्टर ॲक्शन प्लॅन' तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# एसटी सवलत कार्डसाठी नागरिकांच्या रांगा ; तासन्तास प्रतीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या विविध प्रवासी सवलत योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या एनसीएमसी सवलत कार्डाच्या नोंदणीसाठी रायगड जिल्ह्यातील एसटी आगार व सेवा केंद्रांवर नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिक सकाळपासूनच केंद्रांवर रांगा लावत असल्याचे चित्र असून, अनेकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. तांत्रिक अडचणी, इंटरनेटचा कमी वेग आणि मर्यादित मनुष्यबळ यामुळे नोंदणी प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



राज्य परिवहन महामंडळाने महिलांना तिकिटांमध्ये मिळणाऱ्या सवलतीचा तसेच ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या प्रवास सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी सवलत कार्ड अनिवार्य केले आहे. या कार्डामुळे प्रवाशांना रोख रक्कम किंवा सुट्या पैशांची अडचण भासणार नाही. तिकीट काढताना प्रवासभाड्याची संबंधित रक्कम थेट कार्डच्या बॅलन्समधून वजा होणार असल्याने व्यवहार अधिक सुलभ होणार आहेत.

अलिबाग, पेण, पनवेल, महाड, रोहा, माणगाव आणि कर्जत येथील एसटी सेवा केंद्रांवर गेल्या काही दिवसांपासून नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील नागरिक मोठ्या संख्येने नोंदणीसाठी येत आहेत. अनेक ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाइन प्रक्रियेची माहिती नसल्याने ते प्रत्यक्ष सेवा केंद्रांवर जाऊन अर्ज भरत आहेत. त्यामुळे केंद्रांवरील ताण अधिक वाढला आहे.

नोंदणी प्रक्रियेदरम्यान इंटरनेटचा कमी वेग, सर्व्हरमधील तांत्रिक अडचणी आणि उपलब्ध कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे प्रत्येक अर्जासाठी अधिक वेळ लागत आहे. परिणामी रांगा वाढत असून अनेक नागरिकांना उन्हात उभे राहून प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी बसण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली.

एसटी महामंडळाने ऑगस्ट महिन्यापासून सवलतधारक प्रवाशांसाठी हे कार्ड सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र नोंदणीसाठी वाढलेली गर्दी आणि तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती अलिबाग आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.

दरम्यान, एसटी प्रवासी संघटनेचे अमित कंटक यांनी सेवा केंद्रांवरील अपुऱ्या सुविधांबद्दल नाराजी व्यक्त केली. वाढती गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त नोंदणी काउंटर सुरू करावेत, सेवा केंद्रांची कामकाजाची वेळ वाढवावी, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र रांग, बसण्याची व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

पान १ वरुन

## रायगडमध्ये शेतपाणंद रस्त्यांचे तीन महिन्यांत सीमांकन

शेतकरी सन्मान कार्ड दिले जाणार आहे. तसेच जिल्ह्यातील शेतपाणंद रस्ते शोधून तीन महिन्यांत त्यांचे सीमांकन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. याशिवाय रहिवासी घरे कायदेशीर करणे, तुकडेबंदी कायद्याची सुलभ अंमलबजावणी आणि सुमारे ६० ते ६५ हजार आदिवासी बांधवांना वनहक्कांतर्गत ७ ई व १२ ई सातबारा देऊन त्यांच्या बळकावलेल्या जमिनी परत मिळवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याची ग्वाही त्यांनी दिली.

या सोहळ्याला खासदार सुनील तटकरे, माजी खासदार धैर्यशील पाटील, मंत्री आदिती तटकरे, भरत गोगावले, भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेंद्र दळवी, विक्रांत पाटील, प्रमोद जठार, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी सभापती वैकुंठ पाटील, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, महसूल अपर आयुक्त वैशाली उंटवाल, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

समारंभाच्या प्रारंभी मंत्री महोदयांसह सर्व मान्यवरांनी विविध शासकीय विभागांद्वारे उभारण्यात आलेल्या माहितीपूर्ण स्टॉल्सला भेट देऊन योजनांची पाहणी केली. राष्ट्रगीत आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली. या सोहळ्यात महसूल दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महसूलमंत्री व मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

## बाल्मर लॉरी आणि शेल इंडियातील कंत्राटी कामगारांना भरघोस पगारवाढ

व्यवस्थापनाने मान्य केले आहे.

या करारावर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, उपाध्यक्ष रवी नाईक, सचिव विनायक मुंबईकर, दीपक पाटील, जितेंद्र शेळके, बाळू खुटारकार आणि प्रमोद जोशी यांनी स्वाक्षऱ्या केल्या, तर ठेकेदाराच्या बाजूने दिलीप भोईर व लहू भोईर यांनी सह्या करून करारावर शिक्कामोर्तब केले. यावेळी बाल्मर लॉरी व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून एस. बी. कान्हेरे विशेष उपस्थित होते. तसेच मल्हार एम्पोरियल प्रायव्हेट लिमिटेड (शेल इंडिया) येथील फोर्कलिफ्ट ऑपरेटर्सचा पगारवाढ व सोयीसुविधांचा करारदेखील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला.

शेल इंडियाच्या इतिहासात आजवर कंत्राटी कामगारांचा असा करार कधीही झाला नव्हता, मात्र जय भारतीय कामगार संघटनेने व्यवस्थापनाला हा करार करण्यास भाग पाडले. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीतही व्यवस्थापन आणि कामगारवर्ग यांच्यात उत्तम ताळमेळ घडवून आणण्याचे कौतुकास्पद कार्य जय भारतीय कामगार संघटना करीत असल्याचे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. शेल इंडिया येथील या करारानुसार फोर्कलिफ्ट ऑपरेटरच्या पगारात १० हजार ५०० रुपयांची भरीव वाढ झाली आहे. तसेच कामगारांना दोन लाख रुपयांची वैद्यकीय पॉलिसी, कॅन्टीन, बोनस आणि सुट्ट्यांमध्ये वाढ या मागण्या मान्य करण्यात संघटनेला मोठे यश मिळाले आहे.

या करारावर संघटनेच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, उपाध्यक्ष रवी नाईक, सचिव विनायक मुंबईकर, रमेश पाटील, सोमनाथ सांगडे, ऋशाल मढवी, सोमनाथ दरे, सचिन पाटील, सुरज मढवी, सागर गोंधळी, दीपक माळी आणि मरिअप्पा हरिगोई यांनी स्वाक्षऱ्या केल्या. तसेच ठेकेदाराच्या वतीने विनोद खानावकर आणि शेल इंडिया कंपनीच्या वतीने शशांक शेखर उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त खारघरमध्ये गुरुपूजन

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वसंतशेठ यांच्या संगीत, भजन आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच अशा गुणी व्यक्तीचा सन्मान केल्याबद्दल नादब्रह्म साधना मंडळ आणि निवृत्तीबुवा चौधरी यांचे आभार मानून त्यांच्या कार्याचाही गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना वसंतशेठ पाटील यांनी गुरुवर्य निवृत्तीबुवा चौधरी यांनी दिलेल्या ज्ञानाचे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नादब्रह्म साधना मंडळासाठी वेळोवेळी केलेल्या मदतीचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. कार्यक्रमात निवृत्तीबुवा चौधरी यांच्या शिष्यगणांनी सुमधुर आवाजात गुरुपुष्पांजली अर्पण केली. या सोहळ्याला निवृत्तीबुवा चौधरी, उमेश चौधरी, शंकर म्हात्रे, स्वामी म्हात्रे, कृष्णा पवार, अनिरुद्ध पाटील, अनिल यांच्यासह शिष्यगण उपस्थित होते.

## मराठी साहित्यिकेची हिंदीत दमदार एण्ट्री ; 'उधार का उजाला'चे उत्साहात प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी साहित्यविश्वात आपल्या लेखणीची वेगळी ओळख निर्माण केलेल्या कवयित्री प्रज्ञा जांभेकर यांनी हिंदी साहित्यविश्वातही दमदार पाऊल टाकले. सदामंगल पब्लिकेशन प्रकाशित आणि प्रज्ञा जांभेकर लिखित 'उधार का उजाला' या हिंदी कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिराच्या मिनी थिएटरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आणि साहित्यिक विनय हर्डीकर होते. ज्येष्ठ कवी व अभिनेते किशोर कदम तसेच महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव, ज्येष्ठ सनदी अधिकारी डॉ. किरण कुलकर्णीआणि महाराष्ट्राचे पहिले 'भारत श्री' विजू पेणकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते 'उधार का उजाला' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना विनय हर्डीकर यांनी हिंदी भाषेतील स्वतंत्र निर्मिती बद्दल प्रज्ञा जांभेकर यांचे कौतुक केले. त्यांच्या या लेखन शैलीत त्यांनी नव्या वाटा चोखंदळल्याचाही हर्डीकर यांनी विशेष उल्लेख केला.किरण कुलकर्णी यांनी प्रज्ञा जांभेकर यांनी कविता लिहीतानाच्या त्यांच्या शैलीला अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे अधिष्ठान असल्याने त्या अधिक भावस्पर्शी झाल्या आहेत, अधिक हृदयस्पर्शी असल्याचे सांगितले.

किशोर कदम म्हणाले, "मराठी भाषेवर प्रभुत्व असलेली साहित्यिक हिंदी साहित्यक्षेत्रात पदार्पण करत आहे, ही अत्यंत महत्त्वाची आणि स्वागतार्ह बाब आहे. भाषांच्या सीमा ओलांडत साहित्य अधिक समृद्ध करण्याची क्षमता अशा प्रयत्नांतून दिसून येते."प्रज्ञा जांभेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शालेय जीवनापासूनच मला हिंदी साहित्याची विशेष आवड होती. त्या आवडीचेच हे फळ असून, मनातील भावना आणि अनुभव कवितांच्या माध्यमातून हिंदी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे."

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रज्ञा जांभेकर यांच्या कवितांमधील मानवी संवेदना, सामाजिक भान, स्त्रीमनाचे सूक्ष्म चित्रण आणि आशयघन लेखनशैलीचे विशेष कौतुक केले. हा कवितासंग्रह नव्या पिढीतील वाचकांसह हिंदी साहित्यविश्वातही स्वतंत्र ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

साहित्यप्रेमी, कवी, लेखक, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष रंगत आली. कार्यक्रमाच्या शेवटी सदामंगल पब्लिकेशनचे प्रकाशक संदीप चव्हाण यांनी आभार मानले.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त पनवेल महापालिकेचा भव्य सांस्कृतिक सोहळा

**पनवेलः रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज शनिवार दि. १ ऑगस्ट रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : एक लोकपर्व' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा, शाहिरी परंपरेचा आणि सामाजिक विचारांचा सुरेल व प्रभावी कलाविष्कार या कार्यक्रमातून सादर करण्यात आला. अण्णाभाऊंच्या जीवनकार्याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत-नृत्य सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.





कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महापौर नितीन पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका प्रीती जॉर्ज तसेच पनवेल नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी सुदामा धुपे उपस्थित होते.

कार्यक्रमात 'माझी मैना गावाकडं राहिली', 'लहुजी बोले ज्योतीला', 'देशासाठी रणभूमीवर', 'दौलतीचा राजा', 'सांगून गेले भीमराव' यांसारखी लोकप्रिय गीते आणि शाहिरी सादर करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची रंगमंचावर साकारलेली व्यक्तिरेखा विशेष आकर्षण ठरली. पोवाडे, शाहिरी आणि नृत्याविष्कारातून सामाजिक समता, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा आणि परिवर्तनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात महापौर नितीन पाटील यांनी पनवेल महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर प्रथमच अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त इतक्या भव्य स्वरूपाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचा आनंद व्यक्त केला. यापुढेही दरवर्षी ही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे आश्वासन देत त्यांनी अण्णाभाऊंचे जीवन प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, कष्ट आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी साहित्यविश्वात अजरामर स्थान मिळविल्याचे नमूद करत त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह महापालिका प्रशासनाचेही कौतुक केले.

यावेळी प्रास्ताविकात सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांनी अण्णाभाऊ साठे यांचे संपूर्ण जीवन संघर्ष, स्वाभिमान आणि मानवतेचे प्रतीक असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्याने श्रमिक, वंचित आणि सामान्य माणसाला सन्मानाचे स्थान मिळवून दिल्याचे नमूद करत, "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कष्टकरी कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे," या अण्णाभाऊंच्या विचारातून श्रमाचे महत्त्व अधोरेखित झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन महापालिकेच्या माध्यमातून नियमित व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी आभार प्रदर्शन करत अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजच्या आणि उद्याच्या भारतासाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. अल्पावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागरिकांचे तसेच सांस्कृतिक कलावंतांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. यावेळी पाहुणे कलाकार म्हणून केतन वैद्य उपस्थित होते. त्यांनीही गीत सादर करून कार्यक्रमाची रंगत अधिक खुलविली.

## कारवाईनंतरही गुटखा विक्री चढ्या दराने सुरूच

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुटखा आणि सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही पनवेल शहरासह तालुक्यात, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा परिसरात अनेक ठिकाणी गुटख्याची जास्त दराने खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.




अन्न औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंडे विराजमान झाल्यापासून अनेक ठिकाणी सहजपणे उपलब्ध होत असलेला गुटखा काही ठिकाणी बंद झाला. पोलिसांकडून वेळोवेळी छापेमारी करून लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला जात असला, तरी काही दिवसांतच पुन्हा विक्री सुरू होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र कारवाई थंड झाल्यानंतर पुन्हा एकदा शहरातील काही पानटपऱ्या, किराणा दुकाने आणि इतर ठिकाणी गुटखा सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. विशेष म्हणजे भांगेच्या गोळ्या, इलेक्ट्रिक सिगारेट आणि इतर अमली पदार्थ देखील टपऱ्यांवर सहज उपलब्ध होत असल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन युवकांपर्यंतही या पदार्थांची सहज पोहोच होत असल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली आहे.

अन्न, औषध प्रशासन आणि पोलीस यांनी या विरोधात वारंवार कारवाई करणे गरजेचे आहे, मात्र एखाद दुसरी कारवाई वगळता त्यांच्याकडून पुन्हा कारवाई केली जात नाही. गुटखा विक्री थांबत नसल्याने या अवैध व्यवसायामागील सूत्रधारांवर कठोर कारवाई कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



पनवेल : उलवे रहिवासी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अवधेश महतो यांचा वाढदिवस शनिवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप नेते अनंता ठाकूर,अवनीश सिंग, उदय पांडे, मनोज यादव, कपिल यादव, मीना भावसार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



पनवेलः लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिना निमित्त भाजपच्या पनवेल शहर व तालुका मध्यवर्ती कार्यालयात भाजप कामगार आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रवी नाईक यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मधुकर उरणकर, दीपक दुर्गे, उमेश पोतदार, अशोक आंबेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## पमपा मुख्यालयात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठेंना अभिवादन!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज शनिवार, दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी जनसंपर्क अधिकारी नितीन साके, सामान्य प्रशासन विभागाचे लिपिक विष्णू सांगळे, अग्निशमन विभागाचे कर्मचारी, महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि लोकजागृतीपर कार्याला विनम्र अभिवादन केले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, लोककला आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या जीवनाला प्रभावीपणे वाचा फोडली. त्यांच्या साहित्याने सामाजिक समता, न्याय आणि मानवतेचा संदेश दिला असून आजही त्यांच्या विचारांतून समाजाला प्रेरणा मिळत आहे.

## सीकेटी महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने शनिवार दि.०१ऑगस्ट,२०२६ रोजी लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.



याप्रसंगी इतिहासविभाग प्रमुख डॉ.(सौ.) रत्नप्रभा म्हात्रे यांनी लोकमान्यटिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, त्यानंतर सर्वविद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस अभिवादन केले. तसेच परिसंवादसत्रामध्ये इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्याजीवनचरित्रावर, त्यांच्या सामाजिक, राजकीय कार्यावर व त्यांच्या साहित्यावरप्रकाश टाकला. यामध्ये कु. सृष्टी सावंत (तृतीय वर्ष), कु. शुभम कदम (तृतीय वर्ष),

कु. सिद्धी ओवळेकर (तृतीय वर्ष), कु. अनिता घाची (तृतीय वर्ष), कु. गौरी विरशेट्टी(द्वितीय वर्ष), कु. वेदांत अहिरे (द्वितीय वर्ष) आणि कु. कृष्णा सुळे (प्रथम वर्ष)यांनी विशेष सहभाग घेतला. तसेच इतिहासविभाग प्रमुख डॉ.(सौ.) रत्नप्रभा म्हात्रेयांनी लोकमान्य टिळकाच्या भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाचे महत्वसांगून टिळकांच्या योगदानाचे आणि त्यांच्या विचारांचे आजच्या युगातील महत्वपटवून दिले. या परिसंवादामध्ये इतिहास विभागातील ६७ विद्यार्थ्यांनी उस्फुर्तसहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. भावेश भोईर यांनी केले वआभारप्रदर्शन कु.दिक्षिता म्हात्रे या द्वितीय वर्ष इतिहासच्या विद्यार्थिनीने केले.या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्यप्रो.(डॉ.)एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो.(डॉ.) बी. डी. आघाव यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविधविभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.



## सीकेटीत स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागामध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रम संपन्न झाला.

विद्येची देवी सरस्वतीचे पूजन, महान समाज सुधारक व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे, मराठी माध्यम माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी इ. ८ वी अ ची विद्यार्थिनी कु ऐशनी नागोटकर हिने लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती सांगितली.



## शिवगिरी सेवा संस्थानचा गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील कालिका माता मंदिर सभागृहात पनवेल सुकापूर येथील देवद स्थित श्री शिवगिरी सेवा संस्थानच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत धार्मिक वातावरणात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.



आध्यात्मिक, सामाजिक, तथा क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेच्या पनवेल, मुंबई, सातारा तसेच रत्नागिरी भागातील साधकांनी एकत्रितरित्या प्रसाद खोत, मिलिंद पांचाळ, शिवानंद प्रभू, बाळकृष्ण धामापूरकर, सुभाष खोत, आप्पाजी तोंडवळकर, राजू खोत, उदय सावंत, शितल खोत यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार २९ जुलै रोजी सकाळी ११ते ६ या वेळेत साजरा केला. या कार्यक्रमाचे पौरोहित्य पनवेलचे दिगंबर पांगारकर गुरुजी आणि प्रसाद पाध्ये यांनी केले.

याप्रसंगी ब्रम्हलीन श्री १००८श्री महंत शिवगिरी महाराज, मूळपीठ नीलपर्वत, त्र्यंबकेश्वर आणि त्यांचे शिष्य तसेच श्री शिवगिरी सेवा संस्थानचे संस्थापक अध्यक्ष दिवगंत दिलीप खोत उर्फ दादा महाराज यांच्या पादुकांचे षोडशोपचारे पूजन केले.

यावर्षी प्रथमच प्रसिद्ध नारदीयकीर्तनकार ह.भ.प.चंद्रशेखर बुवा अभ्यंकर यांचे मार्गदर्शनपर कीर्तन आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे चंद्रशेखर अभ्यंकर हे "सूर्य नमस्कार" शिबिराचे आयोजन त्याची पत्नी आणि मुलगा यांचे सहकार्याने विरार येथे करीत असतात. त्यात सुमारे ५००० सभासद एकाचवेळी सहभागी होतात. ते सेन्सॉर बोर्डात सदस्य म्हणून काही काळ कार्यरत होते. त्यांचे नारदीय कीर्तनाला पखवाज साथ ओवळा येथील साईनाथ घरत आणि हार्मोनियम साथ खांदेश्वर येथील कीर्तनकार पुरुषोत्तम काजेकरबुवा यांनी दिली.

## शाळेचे बनावट सर्टिफिकेट; दोघांविरोधात गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** शाळेचे बनावट सर्टिफिकेट तयार करून ते पासपोर्ट मिळवण्यासाठी खोटा पुरावा म्हणून सादर केल्याप्रकरणी साहिल कृष्णा पांडे (राहणार सेक्टर ११ नवीन पनवेल) आणि लक्ष्मी कृष्णा पांडे ( सेक्टर ११ नवीन पनवेल) (देश नेपाळ) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात ३१ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील आरोपी हे मूळचे नेपाळचे नागरिक असून त्यांनी भारतीय नागरिक असल्याचे भासवून फसवणुकीच्या उद्देशाने पासपोर्ट मिळवण्यासाठी त्यांची आई मीना कृष्णा पांडे यांच्या लग्नापूर्वीचे नाव गईरे मीना पारस्कर यांच्या नावाचा सरस्वती विद्यानिकेतन स्कूल, विक्रोळी पार्क साईट, मुंबई या शाळेचे बनावट लिव्हिंग सर्टिफिकेट तयार केले.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात अपोलोच्या तज्ज्ञांकडून सीपीआर प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अपोलो हॉस्पिटलतर्फे सीपीआर या जीवनरक्षक तंत्रावरील कार्यशाळेचे आयोजन गुरुवारी (दि. ३०) करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रथमोपचार व सीपीआरचे महत्त्व समजावून देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेमध्ये तज्ज्ञांनी सीपीआरचे महत्त्व, योग्य पद्धत आणि आपत्कालीन प्रसंगी तत्काळ मदत कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उपक्रम सर्वांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक आणि उपयुक्त ठरला. या सत्राचे आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.



# हवस @५२ वर्षे

## तेरी गलियो मे ना रखेंगे कदम आज के बाद...

**झूम प्रहर**


दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



चित्रपट अभिनय प्रशिक्षण केंद्रात एकाच वेळेस अभिनयाचे धडे गिरवणारे चौघे जण साधारण एकाच वेळेस चित्रपटसृष्टीत पाऊल टाकतात, आपापल्या परीने, मिळालेल्या संधीनुसार, आपल्या क्षमतेनुसार मार्ग काढतात, पुढे सरकत सरकत राहतात, पण त्यातला एक चांगली संधी मिळूनही हळूहळू मागे पडत जातो, त्याचे ते स्पर्धेतून बाजूला होत जाणं जाणवत राहते आणि मग तो कलाकार दुय्यम भूमिका स्वीकारून तग धरून राहण्याची धडपड करतो आणि मग तोच त्याचा मार्ग राहतो, त्याला खरंच ओळख मिळते का?

त्याचे नाव अनिल धवन. काहीजण त्याचा उल्लेख 'ढ' वन असाही करत, ही खरं तर त्याची केलेली थट्टाच. पण त्याने लक्षवेधक कामगिरी केली नसेल तर? काही मान्यवर दिग्दर्शकांच्या चित्रपटातून त्याने भूमिका साकारली, आघाडीच्या काही अभिनेत्रींचा तो नायक झाला, त्याने पडद्यावर साकारलेली काही गाणी लोकप्रिय झाली, आजही ती ऐकली जातात, हे त्याचे नशीब, पण त्याची गुणवत्तादृष्ट्या वाढच खुंटली आणि तो नावापुरता अनेक वर्षे, नेमकं सांगायचं तर तब्बल पंचावन्न वर्षे तो काम करतोय, पण त्याला कसलाच ठसा उमटवता आला नाही.

आजच्या ग्लोबल युगातील जेन झी पिढीला अनिल धवन कोण हे सांगायचं तर दिग्दर्शक डेव्हिड धवनचा भाऊ ( अर्थात वरुण धवनचा काका). सिध्दार्थ धवनचा पिता अशी ओळख सांगता येईल. अथवा आणखी ओळख करून द्यायची तर, श्रीराम राघवन दिग्दर्शित 'अंधाधुन "(१९१८) या चित्रपटात ज्याची हत्या होते तो स्टार प्रमोद सिन्हा म्हणजे अनिल धवन. हे धवन कुटुंबीय मुळचे उत्तर प्रदेशातील कानपूर येथील रहिवाशी. वयात येताच अनिल धवनने पुणे येथील दूरदर्शन आणि चित्रपट प्रशिक्षण केंद्र येथे अभिनय शिकण्यासाठी प्रवेश घेतला. साठच्या दशकाच्या उत्तरार्धातील ही गोष्ट. तेव्हा अनेक जण या अभिनय प्रशिक्षण केंद्रात अभिनयाचे गमभन शिकत होते. त्यातील डॅनी डेन्झोपा, शत्रुघ्न सिन्हा, जया भादुरी हे त्याचे सहकारी. सगळ्यानी साधारण एकाच वेळेस मुंबईतील चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले. एकेकाला संधी मिळत गेली. पण अनिल धवनला ती मिळत नव्हती. त्याच सुमारास दिग्दर्शक बी. आर. इशारा हे ' चेतना '( १९७०) या चित्रपटाच्या निर्मितीला लागले. त्यांनी शत्रुघ्न सिन्हा आणि रेहाना सुल्तान यांची निवड केली. पण नायकासाठी योग्य चेहरा मिळत नव्हता.




चित्रपटाचे कथानक अतिशय धाडसी होते. एक वेश्या आणि तिच्याकडे गेलेला नायक आणि त्यातून घडलेलं नाट्य अशी गोष्ट आहे.

शत्रुघ्न सिन्हाने बी. आर. इशारा यांना अनिल धवनचे नाव सुचवले. अनिल धवन त्याना या भूमिकेसाठी योग्य वाटला. बी. आर. इशारा यांनी जुहू येथील एका बंगल्यात सलग चित्रीकरण सत्र आयोजित केले. उर्वरित चित्रीकरण बाह्यस्थळी केले. चित्रपट पूर्ण झाला आणि अनेक ठिकाणी रस्त्यावर त्याचे धाडसी पोस्टर लागले. फाकलेल्या पायाच्या पलिकडे अनिल धवन उभा असे ते पोस्टर वादग्रस्त ठरले. त्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली. याच वातावरणात चित्रपट प्रदर्शित झाला आणि पहिल्याच खेळापासून हिटही झाला. अनिल धवनची सुरुवात अशी चांगली. पहिलाच पिक्चर हिट याचा अर्थ गाडी मार्गाला लागली. बी. आर. इशारा दिग्दर्शित ' मन तेरा तन मेरा "(१९७०. नायिका रेहाना सुल्तान), रविकांत नगाईच दिग्दर्शित 'प्यार की कहानी' (१९७१. नायिका तनुजा.) या चित्रपटात चक्क अमिताभ बच्चन सहनायक आहे. बिचारा. त्याचा सुरुवातीचा पडता काळ होता.), मग १९७१ साली फिरोज चिनॉय दिग्दर्शित 'दो राहा' (नायिका राधा सलुजा), विश्राम बेडेकर दिग्दर्शित 'जय जवान जय मकान' (नायिका जया भादुरी), सी. पी. दीक्षित दिग्दर्शित 'हार जीत' (नायिका रेहाना सुल्तान) वगैरे वगैरे.

यात एक चित्रपट महत्त्वाचा, सावनकुमार निर्मित आणि दिग्दर्शित 'हवस'( मुंबईत प्रदर्शित २ ऑगस्ट १९७४) च्या प्रदर्शनास एकावन्न वर्षे पूर्ण होत आहेत. या चित्रपटाबाबत अनिल धवनवर नशिब फिदा होते असे म्हणता येईल. त्याला चक्क नीतू सिंग नायिका लाभली. तिने बालकलाकार म्हणून कात टाकून नायिका म्हणून सुरुवात करताना आपलं



अस्तित्व अधोरेखित करण्यासाठी जे काही चित्रपट स्वीकारले त्यात 'हवस' होता. नावावरून त्या काळातील हा सवंग चित्रपट. आंबटशौकीन प्रेक्षकांसाठीची करमणूक. या चित्रपटात विनोद मेहरा, प्रदीपकुमार , राज किशोर बिंदू, पाहुणी कलाकार रेखा इत्यादींच्याही भूमिका. मुंबईत ताडदेवच्या गंगा आणि उपनगरातील काही सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला तोच अवघ्या दोन आठवड्यात उतरला. मात्र याच चित्रपटातील सावनकुमार लिखित आणि उषा खन्नाचे संगीत असलेले मोहम्मद रफी यांनी गायलेले तेरी गलियो मे ना रखेगे कदम आज के बाद हे गाणे असं काही लोकप्रिय ठरले की आजही म्हणजेच एकावन्न वर्षांनंतरही ते गाणे लोकप्रिय आहे. आणि पडद्यावर ते अनिल धवनने साकारलेय. तेदेखील कसलीही भावमुद्रा न दाखवता अगदी कोरड्या चेहरा घेऊन हे गाणे त्याने साकारले तेव्हा सेटवर दिग्दर्शक अथवा नृत्य दिग्दर्शक नव्हता का असा प्रश्न पडतो. मोहम्मद रफी यांच्या चाहते हे गाणे ऐकायला थिएटरमध्ये जात आणि गाणे संपले की पुढचा चित्रपट पडद्यावर ठेवून बाहेर पडत. हिंदी चित्रपटाचे संगीत शौकीन इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्समध्ये चार आण्याचे नाणं टाकून हे गाणे पुन्हा पुन्हा ऐकत.

अनिल धवनला उत्तम दिग्दर्शक, आघाडीच्या अभिनेत्री आणि लोकप्रिय गाणी हे आणखी लाभलं. तरीही अनिल धवनची पाटी कोरीच. बासू चटर्जी दिग्दर्शित 'पिया का घर' (१९७२) मध्ये जया भादुरी नायिका. या चित्रपटातील यह जीवन है इस जीवन का हे गाणे आयुष्याचे तत्त्वज्ञान सांगते. शांतपणे ऐकावं. (हा चित्रपट राजा ठाकूर




दिग्दर्शित 'मुंबईचा जावई' या चित्रपटाची रिमेक आहे.), अजय विश्वास दिग्दर्शित 'अन्नदाता'(१९७२) मध्ये जया भादुरी नायिका. या चित्रपटातील गुजर जाए दिन हे अनिल धवनचे सायकलवरील गाणे लोकप्रिय ठरले. दिग्दर्शित 'समझौता' (१९७४) मध्ये योगिता बाली नायिका आणि या चित्रपटातील समझौता गमो से करलो हे गाणे आशययुक्त आहे. दिग्दर्शित 'हनिमून' (१९७२) मध्ये लीना चंदावरकर नायिका. या चित्रपटातील मेरे प्यासे मन की बहार आणि दिन है बहार के फूल खिलने प्यार के ही दोन्ही गाणी श्रवणीय.

दिग्दर्शक, नायिका आणि गाणी यात अनिल धवन सरस होता. तरीही काहीच साध्य झाले नाही. काही चित्रपट यशस्वी ठरले तर काही फ्लॉप. त्याच्या काही चित्रपटांची नावे सांगायची तर, असित सेन दिग्दर्शित अनोखा दान (नायिका अर्चना), राजन बोस दिग्दर्शित यौवन ( नायिका योगिता बाली), जम्बो दिग्दर्शित गुलाम बेगम बादशाह (नायिका मौशमी चटर्जी) वगैरे वगैरे. एक हंस का जोडा (नायिका झाहीरा १९७५) च्या फ्लॉपसह अनिल धवन फारच पिछाडीवर पडला.

अनिल धवन तात्कालिक समिक्षक आणि प्रेक्षकांना प्रभावित करु शकला नाही. कलेच्या क्षेत्रात प्रेक्षक पसंती जास्त महत्वाची. चित्रपटसृष्टीत बराच काळ तरी 'हिरो बैठ गया' अशी एक बोलण्याची पध्दत होती. म्हणजे या कलाकाराचे चित्रपट फारसे पसंत केले जात नाहीत. तो गल्ला पेटीवर 'चालणारा' हिरो नाही. एकदा का हा शिक्का बसला की चित्रपटाचा ओघ कमी कमी होत जातो.

अनिल धवनच्या नायकपदाच्या काळातील समकालीन नायकांचे प्रगती पुस्तक पाहायचं तर, अनिल धवनपेक्षा नवीन निश्चल बरा होता (आपल्या स्टारपणाचा अनावश्यक तोरा त्याला नडला), विजय अरोराही बरा होता (यादो की बारातमध्ये झीनत अमान, फागूनमध्ये जया भादुरी, ३६ घंटे चित्रपटात परवीन बाबी अशा आघाडीच्या अभिनेत्रींचा तो नायक झाला इतकेच), याउलट राकेश पांडे (दिलीपकुमारची कितवी नक्कल बरे?), महेंद्र सन्धु (हा धर्मेंद्रची जागा घेणार आहे म्हणे. काहीतरीच हो.) यांच्यापेक्षा अनिल धवन बरा होता. सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला पुणे येथील दूरदर्शन आणि चित्रपट प्रशिक्षण केंद्रात अभिनयाचे धडे घेणारे बरेच चेहरे आणि जोडीला आणखी काहीजण (कबीर बेदी, विक्रम वगैरे) आले. याची गर्दी खूप होती. महत्त्व होते ते क्षमता, संधी आणि चित्रपटांचे यशापयश.

या स्पर्धेत आपण मागे पडत चाललोय हे अनिल धवनने स्वीकारले आणि सहनायक, अगदी दुय्यम भूमिका, किरकोळ भूमिका यातून आपली वाटचाल सुरू ठेवली. याला व्यावसायिक शहाणपण म्हणतात. आपल्या मर्यादा लक्षात घेऊन जमेल तसे टिकून राहण्यासाठी हा मार्ग सोयीचा होता. आपल्यासोबतच कारकीर्द सुरू झालेले शत्रुघ्न सिन्हा, जया भादुरी, डॅनी डेन्झोपा यांचे पुढे जाणं स्वीकारणं अवघड असले तरी आवश्यक होते. अनिल धवनने घटना, दरवाजा, मौत का साया, राखी और हथकडी, अविनाश, इन्सान बना सैतान, खुनी शिकन्जा अशा अनेक चित्रपटांतून दोन चार दृश्ये केली. अनिल धवनवर अपयशी कलाकार असा शिक्का बसला तरी त्याकडे दुर्लक्ष करत त्याने दूरदर्शन मालिकांमध्ये स्वतःला गुंतवून घेतले. आशा पारेख निर्मित कोरा कागज ही उल्लेखनीय मालिका. त्याशिवाय प्यार का दर्द है मिठा मिठा प्यारा प्यारा, भाग्यलक्ष्मी, सिर्फ तुम वगैरे वगैरे. काही वेबसिरीजमध्येही त्याने काम केले. म्हटलं तर तो थांबला नाही.

आपला दिग्दर्शक भाऊ डेव्हिड धवनच्या हीरो नंबर वन अशा काही चित्रपटांत काम केले पण विनोदाचे टायमिंग जमत वा जुळत नसल्याने ही संधीही फार फळली नाही. हवस चित्रपटाच्या प्रदर्शनास बावन्न वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अनिल धवनवर हा फोकस. कधी कधी अपयशी कलाकाराचीही दखल घ्यायला हवी.

---

# कवी, कादंबरीकार पुरुषोत्तम रेगे

**निमित्त**



श्रेष्ठ मराठी कवी, तसेच कादंबरीकार, नाटककार, समीक्षक व संपादक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा आज जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पुरुषोत्तम शिवराम रेगे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मिठबाब येथे झाला. शिक्षण मुंबई व लंडन येथे बी.ए. व बी.एस्सी. पर्यंत. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून त्यांनी बी.एस्सी. ही पदवी मिळविली होती. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. 'सुहृद चंपा' आणि 'रूप कथ्थक' ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी तर 'रूपकथ्थक' हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु.शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. उदा., छांदसी नावाचा त्यांचा १९६२ साली प्रसिद्ध झालेला समीक्षात्मक लेखांचा संग्रह.

साधना आणि इतर कविता ह्या त्यांच्या काव्यसंग्रहानंतर फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) आणि प्रियाळ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. १९४५ पर्यंतची त्यांची कविता मुक्तच्छंदात लिहिलेली असली, तरी नवकाव्य म्हणता येईल अशीही ती नव्हती. ते वळण १९४५ नंतरचे पण तरीही ते मर्ढेकरी नवकाव्याच्या वळणाचे नव्हते. त्याचे स्वरूप खास रेगेय म्हणता येईल असे होते.

रूपकथ्थक (१९५६) व मनवा (१९६८) हे त्यांचे दोन कथासंग्रह असून त्यांच्या कथांतूनही त्यांच्या कविमनाचे नाजूक पदर व त्यांचे अल्पाक्षरमणीयत्व जाणवते. यांतील काही कथा गुजराती, फ्रेंच, जर्मन, स्वीडिश, स्पॅनिश, रशियन आणि चिनी या भाषांत भाषांतरित झाल्या आहेत.

सावित्री (१९६२), अवलोकिता (१९६४), रेणू (१९७३) आणि मातृका (१९७८) या रेगे यांच्या चारी कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. त्यातील भावविश्व गूढ, तत्वस्पर्शी, सखोल व समृद्ध आहे. सावित्री ही पत्ररूप कादंबरी असून सावित्री आणि अवलोकिता या कादंबऱ्या परस्परांना पूरक ठरतील अशा स्वरूपाच्या आहेत. रेणू आणि मातृका त्याहून वेगळ्या आहेत. त्यामधूनही त्यांच्या कविमनाचे स्त्रीत्वाविषयीचे आकर्षण प्रकट झाले आहे.

रेगे यांना १९६५मध्ये रशिया प्रवासाची संधी लाभली. मॉस्को येथे लघुकथा विषयावर आयोजित परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून त्यांनी भाग घेतला. मुंबई येथे त्यांचे निधन झाले. (साभार इंटरनेट)

---

# केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन

आधुनिक शेतीमध्ये वाढलेला रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर जमिनीचा पोत आणि मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचा समतोल राखत, पारंपरिक आणि रसायनमुक्त शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना मंजूर केली आहे. महाराष्ट्रात या मिशनची अंमलबजावणी भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा (आत्मा) कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावीपणे केली जात आहे. नैसर्गिक शेती ही पूर्णपणे पशुधन आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या संसाधनांवर आधारित असून ती भारतीय परंपरेत रुजलेली एक सुरक्षित पद्धत आहे.

शेती आणि शेतकरी या दोन्हीच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असणाऱ्या शासनाने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहेच पण यासोबतच राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनला चालना देऊन रासायनिक खते आणि रसायने यांच्यावरचे शेतकऱ्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठीही चालना देण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे, बाह्य निविष्ठा खरेदी न



करणे, निसर्गावर आधारित शाश्वत शेती प्रणाली विकसित करणे, मातीचे आरोग्य आणि सुपीकता पुनरुज्जीवित करणे, पाण्याची गुणवत्ता वाढवणे व जैवविविधता जतन करणे आणि शेतकरी, त्यांचे कुटुंब आणि ग्राहकांना सुरक्षित, आरोग्यदायी आणि पौष्टिक अन्न पुरवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेसाठी केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के आहे.

प्रति शेतकरी १ एकर क्षेत्राचा लाभ द्यावयाचा असून त्यानुसार प्रति गट १२५ लाभार्थी निवड. प्रति गट /क्लस्टर २ कृषी सखी (Community Resource Persons-CRP) नियुक्त करणे. कृषी सखी (CRP) यांना केव्हिके स्तरावर प्रशिक्षण देणे. गावपातळीवर जन जागृती कार्यक्रमाचे आयोजन. सहभागी शेतकरी यांना प्रशिक्षण देणे. सहभागी शेतकऱ्यांच्या शेताचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करणे. नैसर्गिक शेती करणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांसाठी अभ्यास साहित्य, फार्म डायरी, FAQ पुस्तिका इ. उपलब्ध करून देणे. कृषी सखी (CRP) यांना मोबाईल उपकरणांसाठी मदत. भारतीय प्राकृतिक जैव-इनपुट संसाधन केंद्राची (BRC) स्थापना करणे योजनेअंतर्गत जिल्ह्यास प्राप्त लक्षांक एकूण ५० गटांचे (क्षेत्र २७०० हेक्टर) लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी नवीन सहा शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यासाठी प्रवृत्त करावयाचे आहे. योजनेंतर्गत समाविष्ट घटक आहेत.

स्थापन केलेले शेतकरी गट ५४, एकूण शेतकरी निवड ६७५० क्षेत्र २७०० हे. निवड केलेले कृषि सखी /सीआरपी १०८, निवड केलेल्या एकूण १०८ कृषि सखींचे केव्हिके स्तरावर ५ दिवसीय निवासी प्रशिक्षण पूर्ण. गावपातळीवर एकूण २१६ जन जागृती कार्यक्रमाचे आयोजन. सहभागी शेतकरी एकूण ६७५० यांना केव्हिके शास्त्रज्ञामार्फत प्रशिक्षण देणेत आले. सहभागी शेतकरी एकूण ६७५० यांना केव्हिके शास्त्रज्ञामार्फत प्रशिक्षण देणेत आले. सहभागी शेतकरी एकूण ६४३० यांना खरीप व रब्बी हंगाम मध्ये प्रोत्साहनपर अनुदान एकूण रक्कम रु. २५७.२० लाख इतके अनुदान वर्ग केले आहे. अभियान अंतर्गत ५४ गटांमधून सहभागी ६७५० शेतकऱ्यांच्या शेताचे एकूण २७०० हेक्टर क्षेत्राचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करून त्यांना "PGS-INDIA NATURAL सेंद्रिय प्रमाणपत्र वितरण करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ मध्ये अभियान अंतर्गत वरील प्रमाणे विविध बाबीवर एकूण रक्कम रु. ३५४.८५ लाख इतके अनुदान खर्च करणेत आलेले आहे. अशी भरीव कामे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा (आत्मा) सातारा कार्यालयाने केली आहेत. तसेच सन २०२६-२७ मध्ये १८७५ हे. क्षेत्र वर १२५ एकर प्रति गट याप्रमाणे एकूण १५ गट स्थापन करण्याचे नियोजनही केले आहे. आत्मा कार्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या प्रभावी उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेतीला आता एक नवी, शाश्वत दिशा मिळाली आहे.

**-वर्षा पाटोळे,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सातारा**

---

# घराघरातून वाढवूया पर्यावरणाचा जागर!

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे. राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

दरम्यान, याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान, राज्य तलाव संवर्धन योजना, शेततळे अभियान, गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण आणि खोलीकरण योजना, नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण आणि शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला आता चालना मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे. आता या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनीदेखील लागू केले आहे. यातूनच प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनादेखील प्रोत्साहन दिले जात आहे.

**-प्रवीण टाके, उपसंचालक,**
**विभागीय कार्यालय, कोल्हापूर**

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग येथे विधी स्वयंसेवक प्रशिक्षण

**रायगड : अलिबाग जिमाका**

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबागचे अध्यक्ष एस.बी.अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांच्या वतीने विधी स्वयंसेवक (PLV) प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी ॲड. तनुष्का पेडणेकर यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट केली तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. प्रशिक्षण कार्यक्रमात डेप्युटी चीफ ॲड. मनीषा नागावकर यांनी पीसी अँड पीएनडीटी कायदा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पीसी अँड पीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसह स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधासाठी समाजात व्यापक जनजागृती निर्माण करण्यावर विशेष भर दिला. मुलगा-मुलगी समानतेचा विचार समाजात रुजवून स्त्री भ्रूणहत्येसारख्या सामाजिक अनिष्ट प्रथांना आळा घालण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. विनायक पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले की, सोनोग्राफीसाठी आलेल्या गर्भवती महिलेवर पीसी अँड पीएनडीटी कायद्यानुसार कोणतीही कारवाई केली जात नाही. मात्र गर्भलिंग निदानासारख्या बेकायदेशीर प्रकारात सहभागी असलेल्या डॉक्टरांवर तसेच संबंधित नातेवाईकांवर कायद्यानुसार कठोर कारवाई व शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे अशा प्रकारांविरोधात समाजात जनजागृती निर्माण करून कायद्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर सुशील सायकर यांनी विधी स्वयंसेवकांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या तसेच आदर्श PLV कसा असावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. समाजातील वंचित, गरजू व दुर्बल घटकांपर्यंत मोफत कायदेशीर मदत पोहोचविण्यात विधी स्वयंसेवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

शैलेश कोंडस्कर यांनी क्षेत्रात काम करताना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य कायदेशीर मार्गदर्शन, विविध शासकीय योजनांची माहिती आणि वेळेवर मदत कशी करावी, याबाबत त्यांनी प्रत्यक्ष अनुभव कथन केले. त्यांच्या अनुभवांमुळे उपस्थित विधी स्वयंसेवकांना समाजसेवेची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवत कंटे यांनी विधी स्वयंसेवकांनी कायदेशीर चौकटीत राहून गरजू नागरिकांना मोफत कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवावी, असे आवाहन केले.

# महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची कर्जतला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी अचानक तालुक्यातील वदप गावातील निली इनपुट्स या शेती अवजारे बनविणाऱ्या लघु कारखान्याला भेट दिली. नवनवीन शेती अवजारे पाहून त्यांनी युवा शेतकरी कारखानदाराचे कौतुक केले.

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी अचानक तालुक्यातील वदप गावातील शेतकरी - शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य निलिकेश दळवी यांच्या 'निली इनपुट्स' ह्या शेती अवजारे बनविणाऱ्या लघु कारखान्याला महाव्यवस्थापक सुजित पाटील, उपमहाव्यवस्थापक देवानंद दुथडे, जिल्हा व्यवस्थापक सुनिल शेळवले यांच्यासह भेट दिली.


अर्जदारातर्फे वकील
ॲड. उज्वला तेटगुरे

**मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल यांचे कोर्टात**

चौकशी अर्ज क. १०४४/२०२६
ने.ता ०५/१०/२०२६
नि/ड ७

**१. सौ. पुष्पा शशिकांत माने**
वय ५२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
राहणार : घर नं २५ कलावती मंदिर जवळ
कोरेगाव जि सातारा रहिमतपुर ता.

**२. श्री. हनुमंत श्रीपती मोरे**
वय ४४ वर्षे, व्यवसाय नोकरी,
राहणार श्रीपती मोरे, गावठाण ओंडोशी
ता. कराड जि. सातारा ४१५१११

**३ श्री. सुनिल श्रीपती मोर**
वय ४० वर्षे, व्यवसाय नोकरी,
राहणार श्रीपती मोरे, गावठाण ओंडोशी
ता. कराड जि. सातारा ४१५१११

...........अर्जदार

**विरूध्द**
कोणी नाही

**जाहिर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी कै. इंदुताई श्रीपती मोरे या दिनांक ३०/०१/२०२६ रोजी ओंडोशी ता. कराड जि. सातारा येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यु पावल्या आहेत, कै. इंदुताई श्रीपती मोरे यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पूढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**विभाग क्र.६, दार ५५३००/- प्रती चौ.मी. सदनिका नं ४०५ चौथा मजला, बिल्डींग नं ४, डी विंग, विस्ता हारमोनी, सर्व्हे नं. ३३/१ प्लॉट नं. १ मौजे करांडे खुर्द ता. पनवेल जि रायगड, क्षेत्र. ३१.३९० चौ. मी कारपेट एरिया आणि ०.८७० चौ. मी कपबर्ड एरिया आणि २.८५०चौ. मी. एन्क्लोज्ड बाल्कनी एरिया या मिळकतीचे (सर्व्हे नं ३३/१ प्लॉट नं. १)**

मयत कै. इंदुताई श्रीपती मोरे यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. कै. इंदुताई श्रीपती मोरे यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शियानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय (व स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व स्तर)**
**पनवेल, जिल्हा रायगड**


# कर्जतच्या जीवन विद्या मिशनमध्ये विद्यार्थी कार्यशाळा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात वैजनाथ येथे असलेल्या सदगुरु वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनमध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी संस्कार शिक्षण आणि मूल्यजागृती यांचे शिक्षण देणाऱ्या कार्यशाळेत सहभाग घेतला. घोडेगाव येथील शासकीय आश्रमशाळेतील १००हुन अधिक विद्यार्थ्यांनी एकदिवसीय संस्कार शिबिरात सहभागी होत वामनराव पै यांचे संस्कार अंगिकारण्याचा प्रयत्न केला.



आश्रमशाळेमधील मुलांमध्ये संस्कार शिक्षण व मूल्यजागृती करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी कर्जत येथील जीवनविद्या मिशन मध्ये आले होते. जीवनविद्या ज्ञानपीठ कर्जत येथे पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथील शासकीय इंग्रजी माध्यमाची आश्रमशाळा येथील आठवी ते दहावीमधील मुलांसाठी एकदिवसीय संस्कार शिक्षण व मूल्यजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांना संपूर्ण दिवसभर सद्गुरू वामनराव पै यांचे तत्वज्ञान यावर कार्यशाळा संपन्न झाली.

विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण शिबिर निःशुल्क आयोजित करून, दर्जेदार व्याख्याने, प्रेरणादायी मार्गदर्शन, प्रेमळ वातावरण आणि उत्कृष्ट नियोजन यांमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर सकारात्मक संस्कार झाले. विशेषतः जीवनविद्या मिशनचे सर्व कार्यकर्ते, राजेश पोवळे यांचे समर्पित सहकार्य आणि या संपूर्ण उपक्रमामागे अविरत परिश्रम घेणारे आदरणीय डॉ. किशोर संख्ये यांचे मोलाचे योगदान सौ. वैशाली राणे यांच्या मार्गदर्शनाखाली विजया वाघमारे आणि भक्ती बागवडकर यांनी विद्यार्थ्यांसाठी 'उत्कर्ष विद्यार्थी संकल्प जीवनविद्येचा' हा अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचा अमूल्य ठेवा प्राप्त झाला.

या उपक्रमासाठी अपर आयुक्त गोपीचंद कदम यांची प्रेरणा घेऊन प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यशाळा यशस्वी झाली. आदिवासी आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांनी सद्गुरू वामनराव पै यांचे अध्यात्मिक तत्वज्ञान यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.


**जाहिर नोटीस**

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे वाशी, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री चांगू काशिनाथ पाटिल व इतर यांच्या मालकीची आहे.

| मौजे | गट कं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| वाशी | २०३/३ | जिरायत ०-९८-१०<br>पो.ख. ०-००-००<br>एकुण ०-९८-१०<br>पैकी ०-४०-०० | ४.५७ |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिल श्री निलय हरेशकुमार शाह यांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दि. ०२/०८/२०२६

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट,**
९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस.,
सातरहाटी उरण, ता. उरण.
फोन नं. ८८७९१४१२३२


# डायरीतील नंबरवरून शोधून २९ हजारांची रक्कम केली परत

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील कर्जत रेल्वे स्थानकात सेवेत असलेल्या पोलिसांनी प्रवाशाच्या लोकल गाडीमध्ये विसरलेल्या बॅगमधील डायरीतील नंबर पाहून २९ हजार पाचशे रुपयांचा ऐवज प्रवाशाला परत केला. रेल्वे पोलिसांच्या या प्रामाणिकपणाबद्दल पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.



मध्य रेल्वेवरील कर्जत स्थानकातील रेल्वे पोलीस हवालदार एकनाथ कोळी हे सेवा बजावत होते. दिनांक ३१ जुलै रोजी दिवसपाळी ड्युटी कर्जत रेल्वे स्टेशन सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत महिला होमगार्ड विद्या भालेराव आणि पूजा पेडणकर कर्जत रेल्वे स्थानकावर गस्त करीत होते. दुपारी चार वाजताच्या दरम्यान आलेल्या लोकलमध्ये बेवारस काळया रंगाची सॅक बॅग आढळून आली.

सदर सॅक या पोलीस कर्मचाऱ्यांनी रेल्वे स्थानकातील जीआरपी कार्यालयात आणून सीसीटीव्ही कॅमेऱ्यासमोर उघडली. त्यामध्ये एक छोटी डायरी आढळून आली. पोलीस कर्मचाऱ्यांनी डायरी पाहिली असता त्या डायरीतील नंबरवरून बॅग आणि त्यातील २९ हजार पाचशे रुपयांचा ऐवज संबंधितांच्या स्वाधीन केला.


**जाहिर नोटीस**

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे विंधणे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री. संतोष बाळकृष्ण घरत व इतर यांच्या मालकीची आहे.

| मौजे | गट कं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| विंधणे | ११५/१४ | ०-२१-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकुण ०-२१-००<br>पैकी ०-१०-५० | ०.५६ |

**सदर मिळकतीमध्ये असलेला १. जनाबाई बाळकृष्ण घरत २. संतोष बाळकृष्ण घरत ३. गुलाब बाळकृष्ण घरत ४. चांगुणा प्रभाकर चिर्लेकर ५. दत्taram बाळकृष्ण घरत ६. मिना सुधाकर घरत ७. हितेश सुधाकर घरत ८. जमनाबाई राजाराम घरत ९. संदिप राजाराम घरत १०. माई संतोष मोकल आणि ११. प्रफुल्ल राजाराम घरत यांच्या हिश्याचे असलेले ०-१०-५० हे.आर.चौ.मी. अविभाज्य क्षेत्र**

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दि. ०२/०८/२०२६

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट,**
९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस.,
सातरहाटी उरण, ता. उरण.
फोन नं. ८८७९१४१२३२



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक दिलीप बारक्या म्हात्रे यांच्या नावे असून सदर मिळकतीचे खरेदीखत हे १५ जुलै २०२६ रोजी उरण येथे खरेदीखत झालेले आहे व ज्याचा दस्ता दुय्यम निबंधक कार्यालय कमांक ५३६८/२०२६ (उरण) येथे **दिलीप बारक्या म्हात्रे (विकणार)** व **श्री. संतोष तुकाराम वाढवणे (खरेदीदार)** या दस्तान्वये खरेदी केलेली आहे. परंतु, काही तांत्रिक अडचणींमुळे आजपर्यंत श्री. संतोष तुकाराम वाढवणे याची नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ वर झालेली नाही व सदर मिळकत ही विकत घेणार नावे **सौरभ कुमार तिवारी, सुनिल धमानिया, योगेश्वर नारायण ठाकरे, त्रिवेदी पार्थिव मुकुंदकुमार, हर्षद रामदास पाटील, नेम सिंग, अनुराग मिश्रा व अमित सुरेश चौधरी** यांना याबाबत पूर्ण ज्ञान व माहिती आहे. तरी दोन्ही पक्षकारांच्या संमतीने ही पेपर नोटीस देत आहोत.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे- पिरकोन (५५३३३९) (PU-ID: 20850045432), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२६/३/अ | १ | ०.१५.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकूण - **०-१७-००** | १.८१ |
| एकुण क्षेत्र ०.१७.०० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यास आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - ०२/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०६
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१





# सागर रंधवे म्हणजे हरहुन्नरी, अष्टपैलू शिक्षक -लोकनेते रामशेठ ठाकूर

## गव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

"सागर रंधवे म्हणजे हरहुन्नरी, अष्टपैलू आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्य समर्पित करणारे शिक्षक आहेत. अध्यापन, साहित्य, पत्रकारिता, वक्तृत्व आणि सामाजिक कार्य या सर्व क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. अशा शिक्षकांचा सन्मान म्हणजे शिक्षण क्षेत्राचा गौरव आहे," असे रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते तथा माजी खासदार श्री. रामशेठ ठाकूर यांनी सागर रंधवे यांच्यासेवापूर्ती सन्मान सोहळ्या बोलतांना सांगीतले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मधील इंग्रजी भाषेचे उपशिक्षक सागर शंकर रंधवे यांच्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि विद्यार्थीकेंद्री शैक्षणिक सेवेला मानवंदना अर्पण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला सेवापूर्ती सन्मान सोहळा रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते तथा माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत दिमाखदार, उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात शुक्रवार दिनांक ३१ जुलै रोजी संपन्न झाला.

या सोहळ्यास संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस, मॅनेजजिंग कौन्सिल सदस्य रविंद्र भोईर, रायगड जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव व्ही. व्ही. पाटील, जनरल बॉडी सदस्य डी. बी. पाटील, शिक्षक व कामगार नेते संजय भगत, शिक्षक नेते भास्कर देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजयशेठ घरत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व ॲड. राहुल घरत, प्रा. भाऊसाहेब खोसे, अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे नेते संजय शिरडीकर, एस बी एन टाइम्स चे संपादक अरुणकुमार बाबरे, दैनिक पुढारीचे वरिष्ठ उपसंपादक चंद्रकांत वाकचौरे, सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता-दिग्दर्शक बाळासाहेब गोरे, रयत बँकेचे संचालक तथा वाशी शाखेचे चेअरमन किशोर पाटील यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. याशिवाय रायगड व अहिल्यानगर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गव्हाण व पिरकोन शाखेचे माजी विद्यार्थी, विद्यमान विद्यार्थी, पंचक्रोशीतील नागरिक तसेच रंधवे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी प्रास्ताविकातून रंधवे सरांच्या त्यांच्या अध्यापनातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांशी असलेले आत्मीय नाते आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव केला. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी स्मित मोकल व आरोही नाळे यांनी आपल्या मनोगतातून सरांविषयीची कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या विद्यार्थीप्रिय, शिस्तप्रिय, प्रेमळ व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान भाजपचे ज्येष्ठ नेते जे..एम.म्हात्रे,वाय.टी.देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत यांनीही सागर रंधवे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

समारंभात बाबासाहेब भोस, संजय भगत, भास्कर देशमुख, संजय शिरडीकर, प्रा. भाऊसाहेब खोसे, देवेंद्र म्हात्रे, बाळासाहेब गोरे, व्ही. व्ही. पाटील, डी. बी. पाटील, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, प्रा. संतोष रंधवे, राजकुमार चौरे आदी मान्यवरांनी रंधवे यांच्या शिक्षक, साहित्यिक, प्रभावी वक्ते, पत्रकार आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचा गौरव करत त्यांच्या कार्याला सलाम केला. यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते सागर रंधवे व त्यांच्या सौभाग्यवती सौ. वैशाली सागर रंधवे यांचा शाल, स्नेहवस्त्र, मानपत्र, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सागर रंधवे अत्यंत भावुक झाले. आपल्या शैक्षणिक प्रवासातील आठवणींना उजाळा देताना त्यांनी विद्यार्थी,सहकारी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, रयत शिक्षण संस्था, पालक,मित्रपरिवार,आणि कुटुंबीयांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर इतिहास घडला

## पहिल्या मालवाहू 'इंडिगो कार्गो' विमानाचे यशस्वी लँडिंग



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (NMIA) प्रवासात आज आणखी एक सुवर्ण अध्याय जोडला गेला आहे. विमानतळावर पहिल्यावहिल्या कार्गो (मालवाहू) उड्डाणाचे यशस्वी लँडिंग पार पडले. इंडिगो एअरलाइन्सचे 'IndiGo CarGo' (Airbus A३२१-२११(P२F)) हे विमान बंगळुरू (BLR) येथून उड्डाण करून नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर दाखल झाले.

या ऐतिहासिक लँडिंगसह नवी मुंबई विमानतळावरून अधिकृत कार्गो सेवा सुरू झाली असून, इंडिगो ही या विमानतळावर कार्गो ऑपरेशन्स सुरू करणारी पहिली एअरलाइन ठरली आहे.१८ वर्षे जुने असलेले हे इंडिगोचे विमान (VT-IKX, Flight ६E९०३१) नवी मुंबईत उतरल्यानंतर कार्गो टर्मिनलच्या दिशेने रवाना झाले. हेच विमान नवी मुंबई येथून पुढे शारजाह (संयुक्त अरब अमिराती) येथे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीसाठी रवाना होणार आहे.

नवी मुंबई विमानतळावर ही सेवा सुरू झाल्यामुळे भारतीय लॉजिस्टिक्स आणि एव्हिएशन इन्फ्रास्ट्रक्चरला मोठी गती मिळणार असून, जागतिक पातळीवरील मालवाहतुकीसाठी कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ होणार आहे. या यशस्वी लँडिंगनंतर येत्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत मालवाहू उड्डाणे पूर्ण क्षमतेने सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# डिजिटल अरेस्ट करून उकळले दीड कोटी

**नवी मुंबई : बातमीदार**

दया नायक असल्याचे भासवून वृद्ध दाम्पत्याला डिजिटल अरेस्ट करून दीड कोटी रुपये उकळल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सहा जणांवर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर सहा महिन्यांनी ३० जुलैला दाम्पत्याला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

नेरूळमध्ये राहणाऱ्या ९० वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. जानेवारीमध्ये त्यांना एका व्यक्तीने व्हॉट्सॲपवर फोन करून मनी लाँड्रिंग गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला असल्याचे सांगितले. त्यानंतर एका व्यक्तीने फोन करून पोलिस अधिकारी दया नायक असल्याचे सांगून वृद्ध दाम्पत्याला डिजिटल अरेस्ट झाल्याचे सांगितले.

तसेच व्हॉट्सॲपवर नोटीसही पाठवली. चौकशीदरम्यान त्यांच्या बँक खात्याची माहिती घेत दीड कोटी रुपये एका खात्यावर पाठवले. पैसे दिल्याने एका गुन्ह्यात अटक टळली अशी भावना दाम्पत्याची झाली. मात्र सहा महिन्यांनी परिचितांकडे वाच्यता केल्यावर फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

# वाजेकर विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे (ता. उरण, जि. रायगड) येथे शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व विचारप्रबोधनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राजू खेडकर यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाचा तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा, साहित्यिक योगदानाचा व सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या कार्याचा प्रभावी परिचय उपस्थितांना करून दिला.



यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकमान्य टिळक यांच्या स्वराज्य, स्वाभिमान व राष्ट्रप्रेमाच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडत सामाजिक समतेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी या दोन्ही महान विभूतींच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे आजीव सेवक प्रा. किशोर सुरेश पाटील यांनी आपल्या मनोगतात लोकमान्य टिळक यांच्या देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि स्वराज्याच्या विचारांचा सविस्तर आढावा घेतला.

तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून समाजजागृती, सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविला, असे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरेश पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी मानले.

या कार्यक्रमास विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# पाणथळ संरक्षणासाठी वचनबद्ध -आमदार डावखरे

**नवी मुंबई : बातमीदार**

१५ वर्षीय फ्लेमिंगोप्रेमी विहानच्या प्रेरणेने भाजपचे ज्येष्ठ विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे यांनी मुंबई महानगर प्रदेशातील धोक्यात आलेल्या पाणथळांच्या संरक्षणाचा ध्यास घेतला आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवे बळ मिळाले आहे.



"माझा मुलगा विहान निसर्गप्रेमी आहे. त्यामुळे आमच्या घरी फ्लेमिंगो आणि पर्यावरणावर नेहमी चर्चा होत असते. या अमूल्य नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण व्हावे यासाठी मी स्वतः सरकारकडे हा विषय प्रभावीपणे मांडणार आहे," असे डावखरे यांनी पर्यावरण कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाशी बोलताना सांगितले.

जागतिक पर्यावरण दिनी सुरू झालेल्या क्लायमेट ॲक्शन नाऊ फॉर मुंबई महानगर प्रदेश या मोहिमेअंतर्गत शुक्रवारी संध्याकाळी नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार आणि पाम बीच ग्रीन्सचे संयोजक श्रीकांत पत्की यांनी डावखरे यांची भेट घेतली.

डावखरे यांनी अलीकडेच महाराष्ट्र विधान परिषदेत लक्षवेधी सूचना मांडून वाढत्या नागरीकरणामुळे धोक्यात आलेल्या पाणथळ, खारफुटी आणि फ्लेमिंगो अधिवासांच्या संरक्षणाचा प्रश्न उपस्थित केला आहे.

यावेळी कुमार यांनी फ्लेमिंगो ब्ल्यू कार्बन अर्बन कॉम्प्लेक्स या अभिनव संकल्पनेची माहिती दिली. या संकल्पनेत पाणथळ, खारफुटी, चिखलपट्टे आणि खाड्यांना एकात्मिक ब्ल्यू-ग्रीन नैसर्गिक पायाभूत व्यवस्था मानून त्यांचे ब्ल्यू कार्बन, पूरनियंत्रण, जैवविविधता, मत्स्यसंपदा आणि इतर परिसंस्था सेवांचे शास्त्रीय आर्थिक मूल्यांकन करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे.केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने या संकल्पनेचे स्वागत करून ती अभ्यासासाठी महाराष्ट्र सरकारकडे पाठवली असून, त्यावर कृती अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

पर्यावरणवाद्यांनी डावखरेंना पाठपुरावा करण्याची विनंती केली. त्यामध्ये नवी मुंबईतील फ्लेमिंगो पाणथळांना कायदेशीर संरक्षण, एनआरआय व टी.एस. चाणक्य पाणथळांचे संवर्धन, महाराष्ट्रातील २३ हजारांहून अधिक नोंद झालेल्या पाणथळांना वैज्ञानिक मान्यता व संरक्षण, तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ७,४०० हेक्टरहून अधिक खारफुटी वन विभागाकडे हस्तांतरित करण्याचा समावेश आहे.

डीपीएस फ्लेमिंगो लेकला 'संवर्धन राखीव क्षेत्र' घोषित करण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असून, शासन निर्णय जारी करण्यासाठी आता केवळ मुख्यमंत्री यांच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा असल्याची बाबही शिष्टमंडळाने डावखरे यांच्या निदर्शनास आणून दिली.कुमार आणि पत्की यांनी पुढील स्थलांतरित फ्लेमिंगो हंगाम सुरू होण्यापूर्वी नवी मुंबईतील फ्लेमिंगो तलाव "पुन्हा गुलाबी तेजाने बहरावेत" यासाठी पाण्याची गुणवत्ता सुधारणे, ऱ्हास रोखणे आणि प्रलंबित कायदेशीर संरक्षण तातडीने लागू करण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती केली.

पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते,एका शाळकरी मुलाने आपल्या वडिलांना फ्लेमिंगो आणिपाणथळांच्या संरक्षणासाठी प्रेरित केल्याची ही घटना पुढील पिढी पर्यावरण संवर्धनाची खरी शिल्पकार ठरू शकते, याची आश्वासक जाणीव करून देते.

# रिटघर विद्यालयात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघर येथिल श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे शनिवार (दि.१ ऑगस्ट्) रोजी वह्या वाटप करण्यात आल्या.सदर प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, स्कूल कमिटी सदस्य,शाळेचे मुख्याध्यापक व उपस्थितांनी कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन केले.

सदर प्रसंगी भूपेंद्र पाटील(उपसभापती, पंचायत समिती, पनवेल) व विश्वजीतपाटील (अध्यक्ष, युवा मोर्चा पनवेल युवा), यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



आमदार.प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १२ वी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांना.भूपेंद्र पाटील, विश्वजीत पाटील , राजेश भोपी, विष्णू भगत,.संजय पाटील,विलास भोपी, मुख्याध्यापक कारंडे.आर.बी. व पर्यवेक्षिका बाबर मॅडम यांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन.पाटील ए.ए., प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे यांनी केले.या कार्यक्रमाचे आभार खुटले मॅडम यांनी मानले.

# नवी मुंबईच्या मोरबे धरणातील जलसाठ्यात वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील उपयुक्त जलसाठा सातत्याने वाढत आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सध्या धरणात ७७.८४ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून, मान्सूनच्या उर्वरित कालावधीत पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस कायम राहिल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, गेल्या २४ तासांत शहरात दोन ठिकाणी झाडे कोसळण्याच्या तसेच अग्निशमन विभागाकडे आगीच्या दोन घटनांची नोंद झाली. शहरात मोठ्या स्वरूपाची कोणतीही आपत्तीजनक घटना घडली नसली तरी महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन विभाग परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. शहरात पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी मोरबे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे जलसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. परिणामी, पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी आवश्यक असलेला उर्वरित सुमारे २२ टक्के जलसाठा येत्या काही दिवसांत उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**पनवेल :** लेखक,सरकारी निवृत्त अधिकारी काशिनाथ जाधव यांच्या महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक पुस्तकाचे प्रकाशन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या पुस्तक प्रकाशनाच्यावेळी प्रा. संजय हिरेमठ,कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी,माजी शिक्षण संचालक रोहिदास पोटे, नगरसेवक गणेश कडू, साहित्यिका जोशना राजपूत, एडवोकेट मनोज म्हात्रे,कोमसाप पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके,समाजसेवक दत्तात्रय जाधव,राजकुमार ताकमोगे आदी उपस्थित होते.

# आज माथेरान घाटरस्ता साडेतीन तास बंद; पर्यटकांकडून नाराजी व्यक्त

**माथेरान : बातमीदार**



पावसाळ्यातील निसर्गसौंदर्य,धुक्याचा आनंद आणि आल्हाददायक वातावरण अनुभवण्यासाठी विकेंडला हजारो पर्यटक माथेरानला भेट देतात.मात्र रविवार (दि..२) रोजी आयोजित करण्यात आलेल्या माथेरान हिल मॅरेथॉन २०२६ स्पर्धेमुळे नेरळ माथेरान घाटरस्त्यावर पहाटे ५ ते सकाळी ८.३० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आल्याने पर्यटकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.याबाबत माथेरानकरांच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

रायगड पोलिसांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत देशभरातील सुमारे चारशे धावपट्टू सहभागी होणार आहेत.स्पर्धेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नेरळ माथेरान घाट रस्त्यावरील संपूर्ण वाहतूक साडे तीन तास बंद ठेवण्यात येणार आहे.त्यामुळे माथेरान कडे जाणाऱ्या पर्यटकांची नेरळ येथे मोठी प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.यावर्षी स्पर्धेच्या मार्गात बदल करण्यात आला असून स्पर्धेची सुरुवात सीमा रिसॉर्ट येथून पहाटे पाच वाजता होणार आहे.धावपट्टू येथून कर्जतच्या दिशेने धावत जाऊन माणगाव फाट्यावरून कर्जत कल्याण राज्यमार्गाने नेरळ मध्ये प्रवेश करतील,त्यानंतर हुतात्मा चौकातून नेरळ माथेरान घाट मार्गे जुमापट्टी व दस्तुरीवर जाऊन पुन्हा त्याच मार्गाने परत येत सीमा रिसॉर्ट येथे स्पर्धेची सांगता होईल.दरम्यान,रविवारी माथेरानला पर्यटकांची नेहमीच मोठी गर्दी असते.घाटरस्ता बंद राहणार असून खासगी वाहने,टॅक्सी तसेच इतर प्रवासी वाहतुकीवर परिणाम होणार आहे.सकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत टॅक्सी सेवा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याने येथे नेरळ रेल्वेस्थानक परिसरातपर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता व्यक्त जात आहे.प्रशासनाने पर्यटकांना नेरळ माथेरान वाहतुक बंदीची माहिती लक्षात घेऊन येथील प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे.तर सकाळच्या वेळी माथेरान कडे जाणे टाळावे किंव्हा वाहतूक पूर्ववत झाल्यावर घाटमार्गाचा वापर करावा

असे सुद्धा सूचित करण्यात आले आहे.त्यामुळे आज माथेरानला जाणाऱ्या पर्यटकांनी वेळेचे योग्य नियोजन करून अनावश्यक गैरसोय टाळावी असे आवाहन या ठिकाणी प्रशासनाने केले आहे.मात्र याबाबत माथेरान मधून घाटरस्ता बंद बाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.येथे पर्यटकांच्या गैरसोयीचा परिणाम माथेरानकरांच्या व्यवसायाला होणार असून पर्यटकांची नाराजीचा सामना येथे स्थानिकांना करावा लागणार असल्याचे सुद्धा बोलले जात आहे.तर यापुढे अश्याकाही स्पर्धांचे आयोजन करताना माथेरानकरांना विश्वासात घेऊन करावे असे देखील सांगण्यात येत आहे.

# खोपोलीत उघड्यावर मद्यप्राशन; तळीरामांवर खोपोली पोलिसांची कारवाई

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्या आणि नागरिकांना त्रास देणाऱ्या तळीरामां विरोधात खोपोली पोलिसांनी कठोर भूमिका घेत प्रभावी कारवाई केली आहे.



खोपोली वाईन्स परिसरात काही व्यक्तींकडून वारंवार धिंगाणा घालून नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना मनस्ताप होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या.या तक्रारींची गंभीर दखल घेत.

खोपोली पोलिसांनी संबंधित परिसरात विशेष मोहीम राबवत दारूच्या नशेत सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या व्यक्तींवर कारवाईचा बडगा उगारला. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, काही तळीरामांकडून रस्त्यावर मोठ्या आवाजात आरडाओरडा, शिवीगाळ तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करण्याचे प्रकार घडत होते. त्यामुळे परिसरातील वातावरण बिघडत होते.

मात्र पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप करून कारवाई केल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.खोपोली पोलिसांनी सार्वजनिक ठिकाणी कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट ईशारा दिला असून अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार आहेत.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

# कोकणच्या कृषी विकासासाठी खासदार तटकरे यांनी घेतली केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांची भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार सुनील तटकरे हे पंतप्रधान ते विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी गाठी घेऊन आपल्या लोकसभा मतदार संघाचे प्रश्न आणि जोरदार मागण्या करीत आहेत. त्यामुळे कोकणातील विविध प्रकारच्या सामाजिक समस्या, विविध विकास प्रकल्प, मार्गी लागतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

कोकणातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती अधिक फायदेशीर करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना देण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांची महत्त्वपूर्ण भेट घेतली. या भेटीत कोकणाच्या कृषी क्षेत्राशी निगडित अनेक दूरगामी आणि विकासाभिमुख मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. विशेष म्हणजे, कोकणातील हवामान, नैसर्गिक संपत्ती आणि कृषी क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र कृषी धोरणात्मक पावले उचलण्याची मागणी खासदार तटकरे यांनी ठामपणे मांडली.

कोकणातील आंबा, काजू, नारळ, सुपारी, अननस, मिरी यांसारख्या नगदी पिकांमध्ये प्रचंड क्षमता असूनही शेतकऱ्यांना अपेक्षित आर्थिक लाभ मिळत नसल्याची बाब निदर्शनास आणून देत कोकणासाठी स्वतंत्र विशेष कृषी विकास व आर्थिक सहाय्य पॅकेज जाहीर करण्याची मागणी करण्यात



आली. या पॅकेजद्वारे आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन सुविधा, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

काळी व पांढरी मिरी लागवडीला चालना देण्यासाठी विशेष अभियान राबविणे, तसेच नारळ, सुपारी आणि अननस लागवडीसाठी ९० टयांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्याची मागणीही करण्यात आली. यामुळे कोकणातील शेतकरी पारंपरिक शेतीबरोबरच अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे वळतील आणि त्यांच्या आर्थिक स्थितीत मोठी सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कोकणातील निसर्गसंपदा, जैवविविधता आणि पारंपरिक शेती यांचा समन्वय साधत विशेष कृषी पर्यटन विकास योजना राबविण्याचाही प्रस्ताव खासदार तटकरे यांनी मांडला. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना शेतीबरोबरच पर्यटनातूनही अतिरिक्त उत्पन्न मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल आणि स्थानिक उत्पादनांना देश–विदेशात नवी बाजारपेठ उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

याशिवाय, सिक्कीम राज्याच्या धर्तीवर संपूर्ण कोकणाला टप्प्याटप्प्याने सेंद्रिय शेती क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी 'विशेष सेंद्रिय कोकण अभियान' राबविण्याची मागणी करण्यात आली. या अभियानाअंतर्गत शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण, सेंद्रिय प्रमाणीकरण, आर्थिक प्रोत्साहन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, विपणन व्यवस्था आणि निर्यातीच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली.

आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांच्या गरजा लक्षात घेऊन ताज्या भाजीपाला व फुलांचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत भाजीपाला आणि फूल उत्पादन क्लस्टर्सच्या प्रस्तावाला तातडीने प्रशासकीय मान्यता व आवश्यक आर्थिक सहाय्य देण्याची विनंतीही करण्यात आली.

या सर्व मागण्यांमुळे कोकणातील शेती अधिक आधुनिक, स्पर्धात्मक आणि शाश्वत होण्यास मदत होईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, कृषीपूरक उद्योगांना चालना मिळेल, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल आणि महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेला नवी बळकटी मिळेल, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

या मागण्यांची दखल घेत केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी विषय गांभीर्याने विचारात घेऊन सकारात्मक सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# जर्मनी व पोर्तुगाल येथील तरुण आणि तरुणीला पडली भात लावणीची भुरळ

## शेती व ग्रामीण संस्कृतीच्या अभ्यासाठी उद्धर येथे दाखल

**पाली : प्रतिनिधी**

कृषी पर्यटन आणि शाश्वत शेतीची थेट युरोपमधील तरुणाईला भुरळ घातली आहे. सुधागड तालुक्यातील उद्धर येथे जर्मनीहून आलेला ॲलेक्स आणि पोर्तुगालची लिली हे दोन तरुण पर्यटक चक्क भाताच्या खाचरात उतरून लावणीचा आनंद घेत आहेत. त्यांच्या या अनोख्या शेतीप्रेमाची आणि भारतीय संस्कृतीशी समरस होण्याची चर्चा सध्या संपूर्ण तालुक्यात रंगली आहे.

जागतिक स्तरावर पर्माकल्चर (शाश्वत आणि नैसर्गिक शेती) बाबत जनजागृती वाढत असताना, हे परदेशी तरुण भारताच्या पारंपरिक शेती पद्धतीचा अनुभव घेण्यासाठी आले आहेत. उद्धर येथील 'आत्मतृप्ती पर्माकल्चर'चे संचालक तुषार केळकर यांच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क साधून ते येथे पर्यटन व अभ्यास दौऱ्यावर आले आहेत. प्रत्यक्ष मातीत काम करण्याचा व ग्रामीण भागात राहण्याचा अनुभव त्यांना घ्यायचा होता. ॲलेक्स आणि लिली चिखलात उभे राहून भाताची रोपे लावली. त्यांच्या या सहभागामुळे स्थानिक शेतकरीही



भारावून गेले आहेत.

भातलावणीच्या अनुभवाविषयी विचारले असता त्यांनी सांगितले की, हे काम आव्हानात्मक असले तरी निसर्गाच्या इतके जवळ जाणे आणि अन्नाच्या निर्मितीची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवणे हा एक अद्भुत प्रकार आहे. केवळ शेतीच नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे आणि खाद्यपदार्थांचेही हे परदेशी पाहुणे चाहते झाले आहेत. ग्रामीण पद्धतीचे जेवण आणि आदरातिथ्याने त्यांना भुरळ घातली आहे.

कृषी पर्यटनाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि शाश्वत शेती पद्धतीचा प्रसार कसा होऊ शकतो, याचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे. या परदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीमुळे स्थानिक तरुणांनाही शेतीकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन मिळाला आहे. सात दिवस हे दोघे फार्मवर राहून पर्माकल्चरच्या इतर विविध संकल्पना आणि ग्रामस्थांसोबत वेळ घालवून भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करणार आहेत. असे तुषार केळकर यांनी सांगितले.

# सुधागड तालुक्यातील सर्व धरणे पूर्ण क्षमतेने भरली; निसर्गसौंदर्य खुलले

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात सातत्याने होत असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे आणि उन्हेरे ही सर्व प्रमुख धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. धरणांचे पाणी ओसंडून वाहू लागल्याने परिसरातील निसर्गसौंदर्य खुलले असून, हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी आणि पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमू लागली आहे.



तालुक्यातील सर्वच धरण परिसरात सद्यस्थितीत पाण्याचे मनमोहक प्रवाह वाहताना दिसत आहेत. विशेषतः कोंडगाव धरणाला पर्यटकांची मोठी पसंती मिळत आहे. धरणाच्या सांडव्यावरून वाहणाऱ्या सुरक्षित पाण्यात भिजण्यासाठी आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी मुंबई, पुणे आणि रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक कुटुंबासह येथे दाखल होत आहेत. सुट्टीच्या दिवशी या पर्यटनस्थळांवर पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे.

धरण परिसरात पर्यटकांचा राबता वाढल्यामुळे स्थानिक रोजगारालाही मोठी चालना मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना कोंडगाव येथील व्यावसायिक राम तुपे यांनी सांगितले की, धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे दररोज मोठ्या संख्येने पर्यटक येथे येत आहेत. निसर्गरम्य वातावरण आणि वाहणारे पाणी पर्यटकांना विशेष आकर्षित करत आहे. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिक, खाद्यपदार्थांच्या गाड्या आणि इतर व्यापाऱ्यांच्या व्यवसायात चांगली वृद्धी झाली असून, या पावसाळी पर्यटनामुळे स्थानिक अर्थकारणाला मोठा दिलासा मिळाला आहे.



मुरुड : मुरुड शहरापासून ५ किमी अंतरावर असलेला सावतखडा धबधबा सुरु झाला आहे. हिरव्यागार जंगलात २०० फुटांवरुन वाहणारा हा धबधबा पर्यटकांना आवडतो, परंतू तेथे जाण्याचा रस्ता व्यवस्थित करण्याची मागणी होत आहे. ( छाया : सुधीर नाझरे)




खोपोली : नगरपालिकेच्या वतीने आज महात्मा फुले मंडई व परिसरात स्वच्छतेचे महत्व पटवून देणारे फलक हातात घेऊन जनजागृती करण्यात आली. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी या मोहिमेत भाग घेऊन कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढवला. (फोटोः जयवंत माडपे)

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंचा दबदबा!

## त्रिपुरातील अस्मिता डेने रचला अनोखा इतिहास

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या अस्मिता डेने ज्युडोमध्ये सुवर्णपदक जिंकत देशाचे नाव उंचावले आहे. महिलांच्या ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात तिने कॅनडाच्या हेडी क्वाचचा २-१ असा पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला. अखेरपर्यंत रंगलेल्या या सामन्यात अस्मिताने संयम आणि उत्कृष्ट तंत्राचा वापर करत विजय मिळवला. राष्ट्रकुल स्पर्धेतील हे तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे यश मानले जात आहे.



त्रिपुरातील बेलोनिया येथील अस्मिताचे वडील अर्जुन कुमार डे सायकल दुरुस्तीचे दुकान चालवतात. मर्यादित उत्पन्न असूनही त्यांनी मुलीच्या शिक्षणासह क्रीडा प्रशिक्षणासाठी कसर ठेवली नाही. तीन भावंडांमध्ये सर्वात लहान असलेल्या अस्मिताला तिच्या कुटुंबाचा कायम पाठिंबा मिळाला.

लहानपणी अस्मिताला धावण्याची आवड होती. ती ८०० मीटर शर्यतीत सहभागी होत असे आणि जिल्हास्तरावर चांगली कामगिरीही केली होती. मात्र, तिची शारीरिक क्षमता आणि चपळता पाहून प्रशिक्षकांनी तिला ज्युडोकडे वळण्याचा सल्ला दिला. हा निर्णय तिच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरला.

२०१५ मध्ये अस्मिताला त्रिपुरा स्पोर्ट्स स्कूलमध्ये प्रवेश मिळाला. तेथे प्रशिक्षक बिना देबनाथ आणि माणिक लाल देब यांच्या मार्गदर्शनाखाली तिने ज्युडोचे प्रशिक्षण घेतले. शालेय आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळाल्यानंतर तिची भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या भोपाळ येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रासाठी निवड झाली. अत्याधुनिक प्रशिक्षण आणि अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे तिच्या खेळात आणखी सुधारणा झाली.

राष्ट्रकुल स्पर्धेपूर्वीही अस्मिताने अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताला यश मिळवून दिले आहे. २०२२ मध्ये बँकॉक येथे झालेल्या आशियाई कॅडेट आणि ज्युनियर ज्युडो स्पर्धेत तिने कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर ज्युनियर आशिया कप, खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये सुवर्णपदके आणि कुवेत सिटी आशियाई ओपनमध्ये रौप्यपदकही तिच्या नावावर जमा झाले.

## नीरजने जिंकले रौप्य, यशवीरने पटकावले कांस्य

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६मध्ये भारताच्या भालाफेकपटूंनी शानदार कामगिरी करत पुरुषांच्या भालाफेक प्रकारात दोन पदके जिंकली. शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या अंतिम फेरीत नीरज चोप्राने रौप्यपदक, तर यशवीर सिंगने कांस्यपदक आपल्या नावावर केले. श्रीलंकेच्या रुमेश थरंगा पाथिराजाने सर्वाधिक ८९.७५ मीटर भालाफेक करत सुवर्णपदक पटकावले.



ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्राने स्पर्धेची सुरुवात ८०.९७ मीटर फेकीने केली. त्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात त्याने ८५.८३ मीटर अंतर गाठत हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. पुढील प्रयत्नांमध्ये त्याने ८१.२९ मीटर आणि ८०.७३ मीटर अशी फेक केली, मात्र श्रीलंकेच्या रुमेश पाथिराजाच्या दमदार कामगिरीमुळे नीरजला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

यशवीरनेही स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी केली. सुरुवातीच्या प्रयत्नांनंतर सातत्याने आपली कामगिरी उंचावली. अखेरच्या प्रयत्नात त्याने ८५.४१ मीटर अंतर गाठत कांस्यपदक जिंकले. ही त्याच्या कारकिर्दीतील वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. यानंतर भारताची २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदकसंख्या २३वर पोहोचली आहे. भारताने आतापर्यंत पाच सुवर्ण, १२ रौप्य व सहा कांस्य जिंकली आहेत. ॲथलेटिक्स व पॅरा-ॲथलेटिक्समध्ये मिळून ११ पदके मिळाली असून ज्युडोमध्ये तीन, वेटलिफ्टिंगमध्ये आठ आणि पॅरा-पॉवरलिफ्टिंगमध्ये एक कांस्यपदक भारताने जिंकले आहे.

## हर्ष सिंगची सुवर्णमय कामगिरी

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६मध्ये भारताच्या ज्युडोपटूंनी दमदार कामगिरी करत आणखी दोन पदकांची कमाई केली आहे. पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात हर्ष सिंगने सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला, तर महिलांच्या ४८ किलो वजनी गटात अस्मिता डे हिने कांस्यपदक पटकावून भारताची पदकसंख्या वाढवली.

हर्ष सिंग राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात पुरुषांच्या ज्युडो प्रकारात सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला. अंतिम सामन्यात



त्याने ऑस्ट्रेलियाच्या जोशुआ कॅट्झचा एकतर्फी १०-० अशा फरकाने पराभव केला. हर्षने सातत्यपूर्ण खेळाने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले.

## प्रीती पवारचे बॉक्सिंगमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक!

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

भारताला ज्या ऐतिहासिक सुवर्णपदकाची प्रतीक्षा होती ते अखेर मिळाले. हरियाणातील भिवानीची प्रीती पवार हिने ग्लासगो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये बॉक्सिंगमध्ये भारताचे पदकांचे खाते उघडले आहे. आशियाई विजेती असलेल्या प्रीतीने आता कॉमनवेल्थ विजेतेपदाचाही मान पटकावला आहे. अंतिम सामन्यात तिने स्कार्लेट सवाना डेलगाडो हिचा ५-० अशा एकमताने पराभव करत दमदार शैलीत सुवर्णपदकावर नाव कोरले.

प्रीती पवारने अंतिम सामन्यात सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. महिला ५४ किलो गटाच्या अंतिम लढतीत भारतीय बॉक्सरने स्कार्लेट



सवाना डेलगाडो हिच्याविरुद्ध पहिली फेरी पूर्णपणे आपल्या नावावर केली. पंचांच्या ५-० अशा एकमताच्या निर्णयाने प्रीतीने पहिली फेरी जिंकली. पाचही पंचांनी तिला १०-९ असे समान गुण दिले. त्यानंतर सुवर्णपदकासाठी आणखी दोन फेऱ्यांची लढत बाकी होती.

पहिल्या फेरीप्रमाणेच दुसऱ्या फेरीतही प्रीती पवारने पूर्ण वर्चस्व गाजवले. या फेरीत प्रतिस्पर्धी स्कार्लेट सवाना डेलगाडो हिला एक दंड गुण (पेनल्टी पॉइंट) देण्यात आला. त्यामुळे भारतीय बॉक्सरचे पारडे आणखी जड झाले. दुसऱ्या फेरीनंतरही पाचही पंचांनी २०-१८ अशी गुणसंख्या देत प्रीतीची आघाडी कायम असल्याचे स्पष्ट केले.

## राज्यस्तरीय थाईबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२६

# रायगड जिल्हा प्रथम अजिंक्यपद पटकावून राज्यात अव्वल

**छत्रपती संभाजीनगर : रामप्रहर वृत्त**

छत्रपती संभाजीनगर येथे दि. २५ आणि २६ जुलैला आयोजित राज्यस्तरीय थाईबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत राज्यातील प्रथम अजिंक्यपदाचा बहुमान मिळवला. रायगडच्या खेळाडूंनी ४४ सुवर्ण, २१ रौप्य व ८ कांस्य अशी एकूण ७३ पदके जिंकून वर्चस्व प्रस्थापित केले. या यशामुळे २१ ते २३ ऑगस्ट रोजी नांदेड येथे होणाऱ्या राष्ट्रीय थाईबॉक्सिंग स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील अनेक खेळाडूंची निवड झाली आहे.




विजेत्या खेळाडूंना थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे उपाध्यक्ष व रायगड थाईबॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश भोसले सर, थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ पनवेल शहरचे अध्यक्ष प्रतिक कारंडे सर, उरण तालुक्याचे अध्यक्ष सुरज टकले सर यांच्यासह प्रशिक्षक सुरेश राठोड, रोहित तळी, योगेश बैकर, सुयश पवार, वरद केणी, प्रथम बहिरा, ओम पिसाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या ऐतिहासिक विजयाबद्दल थाईबॉक्सिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन डॉ. मंदार पनवेलकर सर आणि अध्यक्ष फरहान नबिजी सर यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे राज्यभरात थाईबॉक्सिंग खेळाबाबत जागरूकता वाढली असून पुढील राष्ट्रीय स्पर्धेतही रायगडचे खेळाडू चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास आहे.

**सुवर्णपदक विजेते**

स्नेहा राऊत, अनिकेत दुशिंग, चैत्राशी काकडे, मयूर जाधव, स्वस्तिक भोसले, फिरोज अन्सारी, ऋषिकेश कुमार, करण शिरोडकर, अनन्या पाटील, मनमय झट, वर्धन कदम, एलीजा आदाकुल्ला, मानव बहेकर, मृगाक्षी पॉल, अथर्व मसुरकर, नक्ष मोरे, श्री पवार, प्रणव कांबळे, अर्णव इंगवले, जिया मांजरेकर, आराध्या नंबियार, वंश कोकरे, श्रेयश पवार, काव्या शेजला, शुभम पवार, अर्पित पदक, दर्शित माळी, अद्विका गरगडे, पूर्वा फडके, प्रियल पानसे, प्रभास रहाटे, ए. रुद्रा, आस्था भगत, लावण्य झा, सिद्धी सावंत, सार्थक भगत, दृश्यम झा, यश पाटील, श्रेयश चव्हाण, स्मीत नारंगीकर, आमन जैस्वाल, सिया कोळी, साक्षात फराड, अथर्व भोसले.

**रौप्यपदक विजेते**

जिजा भोसले, प्रिशा पाटील, शिवांक राणा, अविशा शिंदे, वैष्णवी सावंत, स्वामिनी शिर्के, सोहम सावंत, पल्लवी कणसे, श्रेयस कलकुटे, ओम माळी, स्वप्निल राठोड, सानवी सावंत, प्राव्तिक मुंडले, अजिना मुजावर, अगस्या वैदू, आर्या लेंडवे, निष्ठा चंदाने, रयांश जाधव, विहान कालगावकर, श्रेया रहाटे, सतेज पडळकर, सम्यक कदम.

**कांस्यपदक विजेते**

हर्षित राऊत, लक्ष किरूगवल, आरुष नायर, साई मूर्ती, विक्रांत खुटाळे, तन्वी शर्मा, रिया सेल, अदिती पवार.

**सहभाग**

यज्ञेश मोरया, तृप्ती शिंदे, अनिकेत चव्हाण, प्रणव गायकवाड, मयुरेश चव्हाण, विपिन चौधरी, अमृता चव्हाण, अमर जा.

## सीआयएससीई फुटबॉल स्पर्धेत मुलींची बाजी

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची जोड देणाऱ्या शाळेच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. फादर ॲग्नेल हायस्कूल, वाशी येथे आयोजित सीआयएससीई फुटबॉल स्पर्धा २०२६-२७मध्ये रयान इंटरनॅशनल स्कूल, खारघरच्या अंडर-१९ मुलींच्या फुटबॉल संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावला.




स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कौशल्य, सांघिक खेळ आणि चिकाटीचे दर्शन घडवले. फुटबॉलबद्दलची त्यांची प्रामाणिक आवड, नियमित सराव तसेच प्रशिक्षकांच्या कुशल मार्गदर्शनामुळे हे यश मिळाले. संघभावना आणि कठोर परिश्रमाच्या बळावर संघाने हे स्थान मिळवले. सांघिक समन्वय, जिद्द, शिस्तबद्ध सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर संघाने ही उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडाक्षेत्रालाही तितकेच महत्त्व देत आहे.

क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबवले जातात. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही खेळाविषयी प्रेरणा मिळणार असून, मेहनत, शिस्त आणि संघभावनेच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हा संदेश या यशातून अधोरेखित झाला आहे. या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक आणि त्यांना सातत्याने प्रोत्साहन देणाऱ्या पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशिक्षक प्रथमेश पवळे आणि रुही दिघे यांनी यशाचे श्रेय खेळाडूंच्या सातत्यपूर्ण सराव, शिस्त, जिद्द आणि संघभावनेला दिले. "विद्यार्थिनींनी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यात आत्मविश्वासाने खेळ करत उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. त्यांच्या मेहनत, समर्पण आणि जिद्दीमुळेच हा तृतीय क्रमांक मिळवणे शक्य झाले. भविष्यातही यापेक्षा अधिक मोठे यश संपादन करण्यासाठी संघ निश्चितपणे प्रयत्नशील राहील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## जसप्रीत बुमराह फिटनेस टेस्ट पास

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा दिग्गज वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने फिटनेस चाचणी यशस्वीरीत्या पास केली आहे. भारतीय संघ आणि चाहत्यांसाठी ही मोठी आनंदाची बातमी आहे. बुमराह संघात असला की प्रतिस्पर्धी संघावर नेहमीच अतिरिक्त दबाव निर्माण होतो. त्यामुळे फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतर तो कोणत्या मालिकेत भारतीय संघाकडून खेळताना दिसणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार जसप्रीत बुमराहने फिटनेस टेस्ट यशस्वीरीत्या पार केली आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यातील एकदिवसीय मालिकेदरम्यान त्याला दुखापत झाली होती. त्यामुळे त्याने लॉर्ड्स येथे खेळवण्यात आलेला मालिकेतील अखेरचा वनडे सामना गमावला होता. त्यानंतर तो पुनर्वसनासाठी (रिहॅब) बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दाखल झाला होता. आता त्याला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सकडून फिटनेस प्रमाणपत्र मिळाले आहे.

भारतीय संघ १५ ऑगस्टपासून श्रीलंका दौऱ्यावर दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी २८ जुलै रोजी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली होती. या संघात जसप्रीत बुमराहचाही समावेश करण्यात आला होता, मात्र बीसीसीआयने त्याचा सहभाग फिटनेसवर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले होते. आता बुमराहने फिटनेस चाचणी उत्तीर्ण केल्याने तो श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळताना दिसणार आहे. बुमराहने आपला शेवटचा कसोटी सामना नोव्हेंबर २०२५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला होता. जवळपास वर्षभरानंतर तो पुन्हा कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. या मालिकेत त्याची कामगिरी कशी राहते, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष असेल.

## टीम इंडियाच्या वेळापत्रकात बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकाविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय संघाच्या वेळापत्रकात एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. भारतीय कसोटी संघ आणि स्थानिक श्रीलंका XI यांच्यात होणारा सराव सामना आता एका दिवसाने कमी करण्यात आला आहे. आधी हा सामना चार दिवसांचा खेळवला जाणार होता, परंतु आता तो तीन दिवसांचाच असेल. हा तीन दिवसांचा सराव सामना ७ ऑगस्ट ते ९ ऑगस्टदरम्यान कोलंबो येथील एनसीसी मैदानावर खेळवला जाईल.

हे मैदान दुसऱ्या कसोटी सामन्याचे ठिकाण एसएससी स्टेडियमजवळच आहे. दौऱ्यासाठी भारतीय संघ ४ ऑगस्टला कोलंबोला रवाना होईल. बीसीसीआयने संघ निवडीवेळी चार दिवसांच्या सराव सामन्याची घोषणा केली होती, मात्र आता बदलाची माहिती खेळाडू व संघ व्यवस्थापनाला देण्यात आली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com